Comments

DECEMBER 31

आकर्षण म्हणजेच प्रेम !

आकर्षण आणि त्यामुळे असणारी देवाण-घेवाण --

तपस्याभंग होण्याची दृश्ये आणि द्रव्ये आपल्या मनातच असतात --
बाहेर कुठे नसतात ! ( कुणी अगदी तपस्या करतच असेल तर ! )
ती बाहेर असतात, असे म्हणणे म्हणजे आपल्या ' घसरण्याचे ' खापर
दुसऱ्या व्यक्तीवर फोडणेच आहे !

गुंते वाढूच द्यायचे नाहीत असे ठरवले तर गुत्ते वाढतील --

" मी कुठल्याही राजकीय पक्षाच्या किंवा इझमच्या झेंड्याखाली पूर्वी कधीही उभा नव्हतो आणि आजही उभा नाही. माझ्या या मुक्त वृत्तीचा मला अभिमान आहे. माझी कविता मला नवनिर्मितीचा आनंद देते. नवनिर्मितीच्या या स्पर्शातच मी माझं माणूसपण खऱ्या अर्थाने अनुभवतो. काव्यविषयक कुठल्याही सिद्धांताला किंवा प्रणालीला मी स्वतःला कधीही बांधून घेतलं नाही. निर्मितीच्या त्या त्या क्षणी जी प्रेरणा असेल ती मी आंतरिक श्रद्धेने प्रमाण मानत आलो. "
-- मंगेश पाडगावकर -- आजचा मटा -- पृष्ठ -- १४.

५० वर्षे लिहूनही -- आणि कुणीच ' अगदीच फालतू ' म्हटलेले नसूनही -- माझ्या लेखनावर कुणाचाही, एकही लेख नाहीय --

मी नाहीच ना ' भूमिका ' वाला --

आपण ज्यांना हुकूमशहा म्हणतोय त्यांना त्यांची हुकूमशाही आणायला आपण मदत करतोय, हेही कळू नये ! किती ही वैचारिकता !

मुळात, मंगळसूत्र घालणे, शनीची पूजा करणे वा केरळातल्या त्या कुठल्या मंदिरात जाणे -- या सगळ्या तथ्यहीन गोष्टी आहेत -- त्यांतच या बायका का घुटमळत राहतात ?

माझे कै. काका सांगत -- चंद्रकांत, लोक काय करतात की मी तंबाखू सोडली, सोडली, असे सांगत राहतात -- म्हणजेच काय -- मनाने अजून ते तंबाखूतच असतात -- मी तंबाखू इतकी सोडलीय की वाटल्यास खातो सुद्धा !

करमणुकीचे व्यसन लावून आणि त्यासाठी लागणाऱ्या मनःस्थितीचे कौतुक करून --

कुणाशी तरी काही तरी बोलताना, मला नकळत काढलेला फोटो आहे --

.

'हा आता जरा बरा फोटो देतोय --'
आधीचा फोटो बऱ्याच फ्रेंडसना आवडला नव्हता --

मनाची ' मिळवण्याची ' कृती थांबणे -- हेच --

तुकारामाचे ' सखोल ' अभंग, आहे अशा मनाने समजू शकत नाहीत, त्यामुळे, आव्हानच ते !

'हा आता जरा बरा फोटो देतोय --'
आता कुणी फारसे वाईट म्हणत नाहीय, त्यामुळे, दोन वर्षे तरी चिंता नाही --

Champra Deshpande commented on Ravi da Lakhe's post.
' ब्लॅक शीप ' ही शॉर्ट फिल्म मी पाहिली -- तुमचाच त्यातला रोल महत्त्वाचा आहे -- तुम्ही एक उत्तम अभिनेते आहात, हे प्रथमच पाहिले ! फिल्म ' बरी ' आहे -- कथेत मार खाल्लेला आहे -- ते कसे हे सविस्तर सांगायचा प्रयत्न करत नाही -- दिग्दर्शकाशी बोलून ते सांगितले --

माणूस स्खलनशील असतो हे वारंवार सांगावे लागते खरे --

कधी अपराधी भाव, कधी मत्सर, कधी वैफल्य, कोणताही ताण वा नकोसे वाटणारे काहीही --

फटाक्यांनी तर हवा आणि ध्वनी दोन्हींचे प्रदूषण होते --

ऑलिंपिक, एशियाड वगैरे स्पर्धांच्या वेळी होणारी अब्जावधी रुपयांची फटाक्यांची आतषबाजी बंद करावी.

एक सुरुवातीचा, प्राथमिक आणि तातडीचा उपाय म्हणून ( तसेच, यापुढे आणखीही असे उपाय योजले जातील, हे लोकांच्या डोक्यांत घुसवण्यासाठीही ) देशातले फटाक्यांचे सर्व कारखाने बंद करावेत.

प्रदूषणामुळे गुदमरून मरण्याची साथ आली तर तिच्यावर कोणती लस वा कोणते अक्सीर औषध असणार ? एकमेकांना हार-गुच्छ देऊन शेवटचे निरोपच घ्यावे लागणार !

जगण्यासाठी शहरात जायचे की मरण्यासाठी -- हा एक नवाच प्रश्न समोर येणार आहे !

थोड्याच दिवसांत एकच रामबाण उपाय दिसू लागेल -- पूर्ण खंबा संपेपर्यंत पुरेल एवढ्या शुद्ध हवेची बाटली घेऊन सुरू करायचे !

पैसे मातीत गेले वा पाण्यात गेले -- हे चालू होते -- आता हवेत जातील !

प्रदूषणामुळे शाळाकॉलेजेस बंद ठेवावी लागणे ! बाप रे !

उत्पादक कॅनडास्थित कंपनी आहे --

एनिवे, धन्यवाद, संपादक प्रिया लक्ष्मीकांत बेर्डे आणि त्यांचे संपादन पैनल, म्हणजे आपलेच मित्र!!'
माझ्या पत्नीचे के ई एम मध्ये एक ऑपरेशन झाले होते तेव्हा विनायकच्या मिसेस तिच्याजवळ थांबत असत -- विनायक माझा जिगरी दोस्त होता ! माझी ' इतिहास ' ही एकांकिका फक्त ' वाचायला ' चांगली आहे, असे काहीजण म्हणत -- ती एकांकिका विनायकने रंगमंचावर प्रचंड गाजवली !

आता परिसर मोठा आहे -- दोन्ही घरांना ओळखणारे असण्याची शक्यता खूप कमी आहे -- विवाहमंडळात नाव नोंदवणे याचा अर्थच तो -- त्यामुळे, ही काळाची गरज आहे, असेही दिसतेय --

Champra Deshpande commented on his own post.

1. at variance with reason; manifestly false

2. ludicrous; ridiculous

n

3. (Philosophy) the absurd philosophy (sometimes capital) the conception of the world, esp in Existentialist thought, as neither designed nor predictable but irrational and meaningless

होय, खरे आहे -- ऍब्सर्ड थियेटरवरचे मार्टिन एस्लिनचे पुस्तक -- महाग्रेट !

1.

a. Extremely unreasonable, incongruous, or inappropriate: an absurd request.

b. Impossible to take seriously; silly: a character who goes through many absurd adventures. See Synonyms at foolish.

2. Of, relating to, or manifesting the view that there is no order or meaning in human life or in the universe.

3. Of or relating to absurdism.

n.

The condition or state in which humans exist in an absurd universe, without meaning or purpose. Used chiefly with the.

Definition of absurdism

Popularity: Top 30% of words

: a philosophy based on the belief that the universe is irrational and meaningless and that the search for order brings the individual into conflict with the universe

Absurdism is a philosophical perspective which holds that the efforts of humanity to find meaning or rational explanation in the universe ultimately fail (and, hence, are

absurd) because no such meaning exists, at least to human beings. The word absurd in this context does not mean "logically impossible," but rather "humanly impossible".[1]

Absurdism implies a tragic tone and feelings of frustration that arise out of the contradiction between the human quest for the meaning of life and its inaccessibility.

In philosophy, "the Absurd" refers to the conflict between (1) the human tendency to seek inherent value and meaning in life and (2) the human inability to find any. In this context absurd does not mean "logically impossible", but rather "humanly impossible".[1] The universe and the human mind do not each separately cause the Absurd, but rather, the Absurd arises by the contradictory nature of the two existing simultaneously.

वा ! महत्त्वाच्या विषयाला तोंड फोडलेत ! पण, " अभिरुची वाढवत नेली तरच फक्त वपु काळे आणि बाबा कदम वाचणारे वाचक हळू हळू अरुण साधू, जयवंत दळवी आनि खानोलकर वाचतील आणि मग नेमाडे, जीए, ग्रेस वगैरे वाचतील. " -- हे वाक्य जो मूल्यनिर्देश करते तो सैल आणि अमान्य वाटला ! ( मलाही स्ट्रॅटेजिक कॉमेंट देता येते ! -- मैत्रीत मान्य करा -- )

तुम्ही सगळ्या गोष्टींकडे समाजसुधारणेच्या अंगाने पाहता -- मला मुळात हा मानसिक प्रश्न दिसतो -- आणि मी, कधीही, कुणाला सुधारू शकणारा मी आहे, असे समजत नाही --

तर इथे कारणांच्या मुळात जाणेच चालू आहे -- कारणे मनात आहेत -- त्याकडे पाहिल्याशिवाय दुसऱ्या कशाचाच उपयोग नाही --

व्यक्त होण्याचे अनेक प्रकार असतात -- त्यात उपरोध, परखडपणा -- हे सगळे असते -- तुम्हाला वाटते त्याच मार्गाने सगळे व्यक्त होत नाहीत -- तुम्ही स्वतः तुमच्या पद्धतीने जरूर लिहा --

इथे ओरडणे चाललेय ? -- हाही आवाजच आहे -- त्याला तुम्ही ओरडणे म्हणताय -- मग करावे काय ?

भावनिक अवलंबित्व वाईट आणि घातकच !

चातुर्वर्ण्याचा पुरस्कार जिथे दिसेल त्याचा निषेध करून तो नाकारलाच पाहिजे -- पण, ते वगळून, रामदासांचे इतर काही महत्त्वाचे लेखन आहे का, ते पाहायला हरकत नाही. काश्मिर प्रश्न वगळून व्यापाराच्या काही वाटाघटी होतात का ते जरूर पाहावे.

वेगळे म्हणजे, ' वेगळेच काहीतरी ' नाही ना लिहिलेले ?

आणि आपल्याकडे, एका विद्वान टीकाकाराच्या मते, पु शि रेग्यांची कादंबरी ' छापून छापून वाढवलेली ' असते !

अरे, बाप रे ! इथला फारच छान मित्र ! आणि आक्रमक न होता परखड ! नक्कीच अभाव जाणवत राहील ! त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

दोलायमान नसण्याचा क्षण म्हणजे मन नसण्याचा क्षण !

Champra Deshpande replied to Nagesh Wagholikar's comment.
दोलायमान नसण्याचा क्षण म्हणजे मन नसण्याचा क्षण !

-- शरीराला होणारे ८५ टक्के रोग हे मनामुळे होतात !

भ्रम कुणाला होतो ? मनालाच ना ?

१ बुद्धी असंख्य कारण-परिणामांनी घडते -- प्रत्येकाची वेगळी चालते -- हे आवाक्यात नसणे म्हणजे नियती !
२ बुद्धी मर्यादित असते, तिला समग्रतेचे भान घेता येत नाही -- सांस्कृतिक महत्त्व असलेली कला असे समग्रतेचे / एकात्मतेचे भान घेते -- ते बुद्धीला समजू शकत नाही.
३ बुद्धी म्हणजे फूट आणि हिंसा -- ती संस्कृती असू शकत नाही.

.

म्हणजेच, बुद्धीच फक्त असते -- हे तुमचे म्हणणे ! तोच चाललाय विषय !

बुद्धी नाकारायची आणि दगड होऊन पडायचे, असे माझे म्हणणे नाहीय -- जे म्हटले आहे त्याचा प्रतिवाद तर्कानेच करावा लागेल --

' बुद्धिप्रामाण्यवाद्यांना जगण्यातले काही कळत नाही ' -- एवढाच त्याचा अर्थ आहे.

हं -- हा एक मुद्दा आहे -- एकाचा अनुभव जसाच्या तसा दुसऱ्याला पोचूच शकत नाही -- ही गूढता की दुर्बोधता ?

दुर्बोधता ही बौद्धिक क्षेत्रातली असते आणि गूढता ही कधीच बौद्धिक क्षेत्रात येऊ शकणार नाही, अशी असते. इथे बुद्धिप्रामाण्यवाद्यांची टेस्ट असते -- बुद्धीच्या बाहेर काही असूच शकत नाही, अशी त्यांची भूमिका असेल तर तसे त्यांनी म्हणायला हवे -- निदान त्यांनी तरी मूठ झाकली ठेवण्याचा फायदा घेऊ नये --

गूढ म्हणजे बौद्धिक प्रतिक्रिया नसलेला --

सर्व स्त्रियांनी एकूणच मूर्तिपूजा वर्ज्य केली पाहिजे --

उपयुक्त ज्ञानाबरोबरच जगण्याबाबतचे शिक्षण आवश्यक आहे -- विशेषतः मानवी संबंधांचे प्रश्न चर्चिले जावेत --

त्या सगळ्यांना प्रतिक्रिया कशा येणार ते मेंदूतल्या रसायनांवर अवलंबून -- ज्यांना आपण स्वतःची हुशारी समजतो !

धर्मासाठी कोणत्याही मूर्तिपूजेची गरज नाही -- या सत्यापासूनच स्त्रियांनी सुरुवात करावी --

आत्ताचे वा नंतरचे, पुढच्या हजार वर्षांत येणारेही, आपण सगळे समकालीनच असतो ( का ते इथे सांगत बसत नाही ) -- कोण वाचेल, कुठे, कधी -- हे आपल्या हातात नसते आणि आपल्याला माहीत होईलच, असेही नाही ! लिहीत राहा !

' वडापाव आणि दरबारी कानडा ' अशी कथा लिहिणे हा एक उपाय आहे --

इथे फेसबुकचीच ५००० ची मर्यादा आहे -- पुढे फ्रेंड घेताच येत नाहीत --

काही वर्षांपूर्वी सांगलीतल्या भावे नाट्यमंदिरात हा प्रयोग झाला होता. काहींना वाटते की नामवंत स्टार्स आणि वलयांकित दिग्दर्शकच नाटकाला खरा न्याय देतात ! ही कल्पना पूर्ण खोटी पाडणारा हा प्रयोग होता ! अप्रतिम -- संस्मरणीय ! विशेषतः संजय पाटलांचे दिग्दर्शन आणि विवेक देशपांड्यांचा कर्नल -- अति-लाजवाब होते ! हे लोक जर आपापल्या व्यापांत व्यग्र नसते तर यांचे जबरदस्त काम अनेकांना पाहता आले असते ! ( माझे, ' दिनकर पुरोहितचा खून ' हे नाटक. )

मी इथे ज्या पोस्ट देतो त्यात माझ्या ललित लेखनाचे गुणही थोडेफार यावेत, असाही प्रयत्न असतो. मी स्वांतःसुखाय काहीच लिहीत नाही. संवादासाठीच लिहितो. त्यामुळे माझ्या सगळ्या पोस्ट ' पब्लिक ' असतात. हे माध्यम फारच भारी आहे ! क्षणात तुमचे लेखन शेकडो फ्रेंडसना पोचते !

धन्य ! तुम्हाला मी अनफ्रेंड करू ? त्यापेक्षा मीच निघून जाणे बरे इथून --

असे नाही, सगळे आपलेच आहेत -- त्यांच्या भावनांची चौकशी करायलाच हवी --

' उध्वस्त धर्मशाळा ' या नाटकाचे उदाहरण आठवा. डाव्या विचारसरणीच्या माणसाला चौकशीचा त्रास दिला तर केवढा कळवळा निर्माण केला गेला होता ! असे करणारे बरेच पक्षपाती समीक्षकही जोरात होते ! यांच्या सत्ता असलेल्या ठिकाणी हे काय सहिष्णू, संत असतात ? -- हा प्रश्नही त्यांना पडला नाही ! म्हणूनच आशयदृष्ट्या ते एक फालतू नाटक ठरते. त्याच विषयावर आर्थर मिलरचे ' द क्रुसिबल ' हे नाटक आहे -- ते बाजू न घेता, तो एक मानवी प्रश्न म्हणून त्याकडे पाहते -- त्यामुळे ते नाटक मौल्यवान ठरते.

Champra Deshpande commented on his own post.
दुसऱ्यांच्या अस्मिता दुखावल्या जाताहेत तोवर मी अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या आणि सहिष्णुतेच्या बाजूचा असतो ! माझी अस्मिता दुखावली की मी हिंसक होण्याचे स्वातंत्र्य घेणार ! मग, सहिष्णुता गेली तेल लावत !

' उध्वस्त धर्मशाळा ' या नाटकाचे उदाहरण आठवा. डाव्या विचारसरणीच्या माणसाला चौकशीचा त्रास दिला तर केवढा कळवळा निर्माण केला गेला होता ! असे करणारे बरेच पक्षपाती समीक्षकही जोरात होते ! यांच्या सत्ता असलेल्या ठिकाणी हे काय सहिष्णू, संत असतात ? -- हा प्रश्नही त्यांना पडला नाही ! म्हणूनच आशयदृष्ट्या ते एक फालतू नाटक ठरते. त्याच विषयावर आर्थर मिलरचे ' द क्रुसिबल ' हे नाटक आहे -- ते बाजू न घेता, तो एक मानवी प्रश्न म्हणून त्याकडे पाहते -- त्यामुळे ते नाटक मौल्यवान ठरते.

दुसऱ्यांच्या अस्मिता दुखावल्या जाताहेत तोवर मी अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या आणि सहिष्णुतेच्या बाजूचा असतो ! माझी अस्मिता दुखावली की मी हिंसक होण्याचे स्वातंत्र्य घेणार ! मग, सहिष्णुता गेली तेल लावत !

वा. गो. आपटे यांच्या ' मराठी शब्द रत्नाकर ' मध्ये तसा अर्थ दिलेला आहे.

ते सगळे ग्रेट होते यात वादच नाही, पण, ' मल ' चा शब्दकोशातला अर्थ -- घाण, विष्ठा -- असा आहे.. त्यामुळे, काही सापडतोय का दुसरा चांगला शब्द, हे पाहायला हरकत नसावी.

' मल ' रद्द करता येईल का, याकरता चाललाय विचार --

आदिपान -- अंतपान.
मुखपृष्ठ -- पाठपृष्ठ -- हे चांगले वाटते !

Champra Deshpande commented on his own post.
Artistic license often provokes controversy by offending those who resent the reinterpretation of cherished beliefs or previous works.[7] Artists often respond to these criticisms by pointing out that their work was not intended to be a verbatim portrayal of something previous and should be judged only on artistic merit. Artistic license is a generally accepted practice, particularly when the resu lt is widely acclaimed. William Shakespeare's historical plays, for example, are gross distortions of historical fact but are nevertheless lauded as outstanding literary works.[8]

Critical voices are sometimes raised when artistic license is applied to cinematic and other depictions of real historical events. While slight manipulation for dramatic effect of chronology and character traits are generally accepted, some critics feel that depictions that present a significantly altered reality are irresponsible, particularly because many viewers and readers do not know the actual events and may thus take the dramatized depiction to be true to reality.

हा त्याला खोटा इतिहासकार म्हणतो आणि तो याला ! माझ्यासारख्या खूप लोकांना यात इंटरेस्टच नसते आणि बहुसंख्यांचा कवडीचाही अभ्यास नसतो ! कोणता खरा इतिहास ? ( ही अर्थातच एक उपरोधिक पोस्ट आहे. )

ज्या भूतकाळासह आपले आजचे व्यक्तिमत्व आहे असे आपण समजतो, तो भूतकाळ ' नीट ' राहण्याशी मतलब ! यात कुणालाही इतिहासाशी काही देणेघेणे नाहीय ! वेगवेगळ्या प्रकारे, बहुसंख्यांची हीच स्थिती आहे !

माझ्या ' इराक ' या नाटकात एक मराठी पुरोगामी लेखक अमेरिकेच्या अध्यक्षांना भेटतो, असे एक दृश्य आहे -- ते दोघांपैकी कुणाही एकाचा अवमान करणारे धरले जाऊ शकते !

" चांगले दिले की येतात लोक ! " -- या वाक्याचे काय होईल मग ?

'काशीबाई आणि मस्तानी एकत्र नाचल्या यावर लोक आक्षेप घेत आहेत. मला असं वाटतं ती भन्साळींची क्रिएटिव्ह लिबर्टी आहे. पण बाजीरावाने आपल्याला सेम साड्या घेऊन दिल्यावरही दोघी चिडत नाहीत उलट हसतहसत नाचतात हे अत्यंत अनरिअलिस्टिक आणि आक्षेपार्ह आहे. म्हणून मी या गाण्याचा निषेध करतो!'
आणि ' देवदास ' मध्ये सेम असेच एक गाणे हिट नव्हते का झाले ?

आमचे गाव म्हटले जाते ते मी फक्त एकदा चक्कर मारून पाहिले -- मुंबईतला माझा जन्म आहे, पण, मुंबई हे माझे गाव, असे थोडेच म्हणता येते ? मला माझे गावच नाहीय --

सर्वांनी आपले मुद्दे मांडावेत -- अमुक एक पटवून देणे हा माझा हेतू नसतो --

' सांगोपांग दर्शन ' हे महत्त्वाचे ! याचा अर्थ, ' अमुकच ' असा जगण्याचा अर्थ लावता येण्याची शक्यताच नसणे ! ते भान म्हणजेच समज -- wisdom !

अमुक असा परिवर्तनवादीपणा कमी झाल्याशिवाय वरील वैशिष्ट्ये येत नाहीत.

भ्रष्टाचाराबद्दल एका ऑडिटरचे मत -- तुम्ही मधाची बाटली संभाळायला एखाद्याकडे देऊन गेलात तर तो एखादे बोट चाटून बघणारच ! तेवढे तर सोडूनच देणे ठीक --

अमुकच असा नियम नाही. प्रायोगिक आणि व्यावसायिक नाटकांच्या नेपथ्याचे विचार वेगवेगळे असू शकतात. प्रायोगिक नाटक अत्यावश्यक तेवढ्याच वस्तू वापरेल ( प्रत्येक गोष्टीला पैसे पडतात ! ) -- याच्या उलट, एका व्यावसायिक नाटकात स्वयंपाकघरातल्या बेसिनच्या नळाला पाणी येते, हेही मी पाहिलेले आहे. ते सर्व नाटकाच्या स्वरूपावर अवलंबून आहे. काहीजण नेपथ्याला टाळी घेऊ इच्छितात तर दामू केंकरे म्हणत की नेपथ्याला टाळी पडली तर ते नेपथ्य फसले आहे, असे समजावे !

या विषयावर मी डॉक्टरेट करू शकतो -- अहो, वर्षानुवर्षे तेच काम करणाऱ्या लोकांना कळत नाहीत अशा अनेक गोष्टी आपल्याला कळू शकतात ! इलाज नाही !

बुद्धीने वा तथाकथित विवेकाने ठरलेले निष्कर्ष आणि सर्जकता यांचा संबंध काय -- या प्रश्नात शिरावे लागेल --

त्या त्या काळातल्या मूल्यमापनावर समीक्षकांचेच शिक्के असतात -- कलावंताच्या योग्यतेबाबतचे समज तेच पसरवू शकतात --

सूफी हे शांततेला महत्त्व देतात -- सूफी कव्वालीत संगीतयुद्ध घेतलेय !

उत्तम माहिती दिलीत ! मला तो फरक जसा कळत नाही, त्याचप्रमाणे, संगीतातल्या दोन घराण्यांमधलाही फरक कळत नाही --

वा ! ही एका वेगळ्याच अंगाने चर्चा चालू झालीय -- चलने दो --

या चित्रपटातल्या अभिनयाच्या बदलत्या पट्ट्या -- हेही वात आणणारे आहे -- एडिटिंगही त्रासदायक आहे --

तसे नाही --टाईमपास हाच हेतू आहे -- आशयाच्या अंगाने विचारच केलेला नाहीय --

दिलखुलास स्तुती करण्यातही मी मागे नसतो, हे तुम्हाला माहीत नसावे --

जागतिकीकरणामुळे मुळं तुटायची गरज नाही - प्राची दुबळे यांची मुलाखत
aisiakshare.com

प्राचीचा गहन अभ्यास सहज, साधा वाटावा इतकी ती तिच्या विषयावर स्वार झालेली आहे ! ' रिचर्डस बॅटिंग करतो तेव्हा बॅटिंग करणे फार सोपे आहे, असे वाटते ' असे म्हणतात ना, तसे !

सगळेच असे एकमेकांचे निषेध करायला लागले तर सरकारी गोदामांत समृद्ध अडगळी तयार होतील !

चला, आता ही जुगलबंदी थांबवून एकूण सदिच्छांसह बोलू --

सण म्हणजे धर्म नव्हे -- हे अबाधितच !

Champra Lekhan
champralekhan.com
माझ्या आठवणीप्रमाणे ' सामुदायिक नेतृत्व ' ही संकल्पना कै यशवंतराव चव्हाण यांनी मांडली होती. त्या काळात मी याच विषयावर ' समुदाय ' नामक एक एकांकिका लिहिली होती. ती माझ्या वेबसाईटवर वाचायला उपलब्ध आहे -- www.champralekhan.com -- इथे पाहा --

सध्या, नेटवर पाहून ऍक्युप्रेशर बिंदूंना उपचार देऊन पाहा --

लाज-लज्जा, विचार, प्रणाली वगैरे सगळे ढगात गेल्यावर अजूनही तुम्ही राजकीय ज्ञान वगैरे मानता ?

लाजायचे नाही -- हा पायाच ठेवायचा हो !

अगदी बरोबर -- नाही तरी विचार, अजेंडा यांना कुठे आहे महत्त्व ?

तुम्ही म्हणताय त्या प्रश्नांना, खरेच, कुणी महत्त्व देताना दिसतोय ?

तिकडे, कुठेतरी कोपऱ्यात बिनबोभाट चालू द्या अंधश्रद्धानिर्मूलनाचा कार्यक्रमही !

नाही, मी ते पाहिलेले नाहीय -- ' नव-अनुष्टुभ ' ने दोनदा माझे असे इथले लेखन प्रसिद्ध केले होते -- आता तसे खूपच साठलेय -- सवडीने माझ्या वेबसाईटवर तर जमा करेनच -- धन्यवाद ! खूप शुभेच्छा ! आपले ' नाटक ' चे अंक माझ्या संग्रही आहेत !

हे सगळे मी एकीकडे सेव्ह करून ठेवत असतो --

बौद्धिक घट्टपणा सोडणे, ही भूमिका असू शकत नाही --

ओवेसींनी एक निरीक्षण भारी मांडले आहे -- निवडणुकीत जेव्हा बीजेपीचा प्रमुख विरोधक काँग्रेस असतो तेव्हा बीजेपी जिंकते आणि प्रमुख विरोधक काँग्रेसेतर असतो तेव्हा बीजेपी हरते !

जनतेला कळत नाही, असे म्हणणे, ही हुकूमशाहीची भलावण होईल !

असंख्य प्रभावांतून जनता निर्णय घेत असते ! ती शहाणीच म्हणायला हवी !

लोकशाही मानली की जनतेच्या शहाणपणावर विश्वास ठेवावा लागेल !

आपण धर्म न पाळणारे समानधर्मी !

यापेक्षा माझी अवस्था खूपच बरी आहे -- माझ्याकडचे ज्ञान आटोपशीर आहे !

वैचारिक भूमिकेसाठीही हत्या करू नयेत -- हेही त्याचबरोबर घ्यायला हवे. धर्माच्या नावाखाली आणि विचाराच्या नावाखाली -- यांत काहीच फरक नाही.

कालांतराने समजा पुन्हा काँग्रेसची सत्ता आली तर हे समाजवादी पुन्हा बीजेपीबरोबर पाचव्या स्वातंत्र्याच्या क्रांतीला बाहेर पडतील ! कितवे स्वातंत्र्य, हे मोजत बसणे, हेच त्यांचे भवितव्य दिसते !

आणि विरोध करायचा असला की ते ' विधिनिषेधशून्य ' लोकांबरोबरही जातात ! आणि विरोध हेच तर त्यांचे जीवन होऊन बसलेले आहे !

मनाच्या क्रियाप्रतिक्रियांची पद्धत सगळ्यांची सारखीच असते. त्याच कृतींचे कमीजास्त अनुभव देणे-घेणे -- हे मी कलेचे अत्यंत प्राथमिक वा छोटे काम समजतो. पुनःप्रत्ययाची कला जी म्हणतात ती मला निरर्थक वाटते. कलेचे सांस्कृतिक महत्त्व असल्या गोष्टींमुळे नसते.

जी मनोरचना सगळ्यांचीच समान आहे ती उगीच उदात्त करून का व्यक्त करत बसावी ? माझी विदीर्णता मी तुमच्या डोक्यात घालायचा प्रयत्न का करावा ? -- तसे करणारी कला मला अर्थहीन वाटते --

उदा समाजवादी कुणी निवडून येत नाही --

राजकारणात -- निवडणुकीत टोटल अपयशी ठरणारी भूमिका कला-साहित्य क्षेत्रात आघाडीवर असते -- हीही एक अर्थपूर्ण गोष्ट असतेच --

मुळात प्रेमभंगासाठी वयाचा काही प्रश्न नसतो -- पण, एकूणातच ही पोस्ट समावेशक आहे -- त्यावर बोला --

मला इतिहासातले काही कळतच नाही -- तुम्ही सांगताय ते मी तंतोतंत खरे धरून चालणार !

मग, ' ठेविले अनंते तैसेची राहावे ' याची चेष्टा का करतात लोक ?

मला कॅथार्सिसची उपपत्ती संशयास्पद वाटते --

एखादे दर्दभरे गाणे ऐकत, मंद प्रकाशात, हवेतल्या एखाद्या अदृश्य कणावर मन केंद्रित झाल्याप्रमाणे, ' मी दुःखाशी किती खोल एकरूप झालोय ' या समाधानाची ऐश करत जगायचे दिवस संपतील की काय आता ?

खरे तर आपली माती म्हणजे आपल्या मनाची माती ( चांगल्या अर्थाने ). त्याबाहेरचे कुणी काही करूही नाही शकत -- ग्रामीण जीवन, गरिबी आणि विषमता व अन्याय -- हे विषयच फक्त आपल्या मातीतले समजले जात असावेत ! शहरात ज्याचे जीवन गेले त्याने कुठून आणायची ' आपली माती ' ?

यावर माझे म्हणणे जरा वेगळे असते -- नाटक म्हणजे जगण्याचे भान देण्याची प्रक्रिया -- नाटकाबरोबर सुरू झालेली ती प्रक्रिया महत्त्वाची -- पुढे ज्याचेत्याचे जगणे -- प्रेक्षकाने नाटक बरोबर नेण्याची वा डोक्यात बाळगण्याची गरज नाही -- असे काय काय बाळगणार ? नाटके, चित्रपट, पुस्तके -- डोक्याची नुसती समृद्ध अडगळ होऊन बसेल --

होय, असेच म्हणायचे आहे ! प्रत्येकाचा पिंड, आकलन, दृष्टिकोण वेगवेगळे असतात -- कपिलदेव का नाही झाला हॉल-गिलख्रिस्त यांच्यासारखा ?

उदाहरणार्थ हिंसा आणि लैंगिकता घेऊ -- तेंडुलकरांनी समजा यांतली विविधता ( व्हरायटी ) दाखवली -- म्हणजे शोध घेतला ?

नसावे -- आणीबाणीत मी काही फायटिंगबियटिंग केले नव्हते -- ईमानेइतबारे नोकरी करत होतो -- सगळे वेळेपूर्वी दहा मिनिटे आपापल्या खुर्च्यांत आलेले असत -- आम्हा अधिकाऱ्यांच्या दृष्टीने अच्छे दिन होते ! लोकही खुश असत -- कामे वेळेत होत !

योगायोगाने मीही हल्ली योग करू लागलोय !

विचाराशी वा धर्माशी लोक समरूप ( identify ) झाले की विषाची निर्मिती सुरू होते !

तिरसट म्हणजे ज्याच्या कदापि नादी लागू नये, तिरकस म्हणजे ज्याच्याशी संवाद साधायला हरकत नाही आणि तिरपागडा म्हणजे इंटरेस्टिंग -- मजेदार !

माझ्या पोस्टरमध्ये मी प्रमुख भूमिकेत असल्याचे सांगितले आहे पण तो चित्रपट नायिकाहीन आहे -- त्यामुळे, त्या प्रमुख भूमिकेचेही अप्रूप गेलेय !

Idea of eternity also will not allow any meaning -- only limited particulars can have some meaning

माझ्या, दोन नायिकांच्या नाटकातली एक नायिका !

विवेक जिथे पोचतो ते सत्य, असे काही नसते, हे म्हणायचे आहे --

-- या पोस्टला माझे उत्तर असे आहे की -- नाही, तसे नाही होणार. फाटाफूट करणे, तुकडे पाडणे, अलग होणे -- ही माणसाच्या मनाची अटळ वैशिष्ट्येच आहेत -- एका ग्रहावर एक पक्ष गेला तरी तिथेही त्या पक्षात फूट पडेल आणि अनेक पक्ष निर्माण होतील !

आभासी जग हे सत्यच आहे, असे समजायला सुरुवात करणे !

तन्वी, सणांशी समरूप न होणारे माझ्यासारखे काही असतात, त्यांच्यासह केलेले हे स्वगत आहे !

वाईटातून चांगले असे की त्याबाबतची ' लागण्याची ' मनःस्थितीही खलास होत चाललेली आहे -- तशा शिव्यांचा परिणाम होणेही नष्ट होत चाललेले आहे --

Champra Deshpande commented on his own post.
Anger and hatred are natural, but they are also some of the most toxic emotions that we can have. Feelings of rage and hatred build up in the mind, body and soul, affecting the body's organs and natural processes and breeding even more negative emotions. Expressing anger in reasonable ways can be healthy, but explosive people who hurl objects and yell at others frequently may be at greater risk for heart disease. Prolonged bouts of anger can take the toll on the body in the form of high blood pressure, stress, anxiety, headaches and poor circulation. Research also shows that even one five-minute episode of anger is so stressful that it can impair your immune system for more than six hours. All of these health issues can lead to more serious problems such as heart attacks and stroke. Anger and hatred can be directed at yourself or at other people, but either way you lose when you allow these negative foods for the soul to take over

February 14, 2012 |
By Laura Schwecherl
The Surprising Health Effects of Love

Forget the medicine cabinet— romantic relationships can be a ticket to good health . (Thanks, sweetie.) But is Cupid’s bow a double-edged sword? We took a closer look at love— from long-term relationships to casual encounters, marriage to heartbreak— to see how it really affects our health.

Heart Healthy — The Need-to-Know

Love isn’t all about the butterflies. There are chemical processes in the brain that affect how we feel . When we’re with a significant other, the body releases hormones, like oxytocin and dopamine, that signal feelings of trust, pleasure, and reward. And all that happens in the brain may be good for the heart— literally. In one study, researchers found people’s blood pressure was lower when they were with a romantic partner than when they were interacting with anyone else. (Guess they weren’t fighting…) . Scientists suggest blood pressure’s lower in these situations because romantic partners feel familiar and comfortable with each other. Yet, even new relationships have their advantages— researchers discovered fresh love may shield against stress . Oh, the joys of the “honeymoon” stage.

-- हे वेगवेगळ्या ठिकाणांहून घेतले आहे -- या बाबतीतले बरेच काही उपलब्ध आहे नेटवर --

Champra Deshpande commented on his own post.

Scientists prove it really is a thin line between love and hate

independent.co.uk

http://www.independent.co.uk/news/science/scientists-prove-it-really-is-a-thin-line-between-love-and-hate-976901.html

-- या लिंकवरचा मजकूर वाचून पाहावा --

Champra Deshpande commented on his own post.

While oxytocin may enhance positive emotions and pro-sociality with the people we care about, it may also contribute to negative views and behaviors towards people to whom we are not close.

माझ्या नोकरीच्या २८ पैकी १२ वर्षे हडपसरमध्ये गेली --

हौ --- मान्य करणे
हं -- ऐकून घेणे
है -- म्हणजे अवजड काही उचलताना उपयोगी पडणारा आवाज --
हो हो हो -- शांतपणे थांबायला सांगणे --

मला मिळालेले पुरस्कार राज्यस्तरीय आहेत -- फार मोठे काही नाहीय -- आणि राष्ट्रवादीच्या नेत्याच्या हातून मिळालेला पुरस्कार फडणवीसांना परत करू ?

पुरस्कार परत करणाऱ्यालाही पुरस्कार आहे ? तो कोण देणार आहे ?

मलाही स्वर्गसुख चालते !

किरण, मी प्रश्न उपस्थित केला आहे -- त्यावर चर्चा व्हावी हा हेतू आहे -- निष्कर्ष तू वा मी काढून द्यायची गरज नाही -- तो ज्याचा तो काढेल --

मला त्रास होतोय की नाही तो मुद्दाच नाहीय -- तुझे बोल -- मी फक्त माझे आकलन मांडलेय -- त्याचा तुला त्रास होत असेल तर इलाज नाही --

म्हणजे, तुम्हाला न पटणारे बोलले कुणी की तुम्ही त्याला ' एवढा मोठा वादंग ' म्हणणार -- तसे दुसऱ्यांनी तुमच्याबद्दल केलेले चूक का म्हणताय मग ?

आपल्या मतांत, आकलनात काही फरक असू शकतात -- त्यामुळे तुला माझ्याकडून काय अपेक्षित आहे वा मला तुझ्याकडून काय अपेक्षित आहे -- याला फारसा अर्थ नाही -- आपल्या दोघांपैकी कुणीही सत्याचे वा श्रेयस्कराचे प्रतिनिधी आहोत, असे कसे म्हणणार ? असे म्हणता येत नसल्यानेच तर लोकशाहीची, विचारस्वातंत्र्याची गरज आहे --

तसे तर झुक्या भी छोडो -- एकूणच या जगातच कशाचा काय भरोसा आहे ? घटनेत आहेत अधिकार, पण झटक्यात -- कुछ भी हो सकता है !

जगण्यातला विरोधाभास आणि निरुत्तर करणाऱ्या परिस्थिती कधी दिसतात, कधी कुणाच्या बोलण्यातून लक्षात येतात -- मी इथे मांडतो ते सगळे माझेच म्हटले तर मला शेकडो आयुष्ये जगावी लागतील !

कोण्या कारणे हे जालेसे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।। -- तुकाराम.

अविभक्त मन दुसऱ्याच्या विभक्त मनाची कल्पना करत नाही --

त्या पोझेस -- पवित्रे -- असतात --

असे व्हावे, तसे व्हावे -- या प्रकारच्या अंतिम सत्याच्या कविता बऱ्याचदा वाचनात येतात. ' अमुक व्हावे ' असे कवी म्हणतो, याचा अर्थ ते घडलेले नाही -- मग, ते काही आदर्श, अंतिम आहे असे त्याला का वाटते ? तर, अर्थातच सध्याच्या त्याच्या ' असण्याच्या ' पार्श्वभूमीवर त्याला ते तसे वाटते. ' अपूर्ण ' अवस्थेतून ' पूर्णत्व ' कळूच शकणार नाही, हे तर स्पष्टच आहे. त्यामुळे, अशा कविता मला नुसत्याच स्वप्नरंजनात्मक आणि खोट्या वाटतात.

वा ! सणसणीत आत्मविश्वास !

माणूसच फुटलाय आतून -- त्याचा देव कसा एकसंध राहणार ?

अंतर्ज्ञान, अंतर्दृष्टी -- हे शब्द पटत नव्हते -- बराच वेळ डोक्यात भाषा तडफडत होती -- शांत होताच, अचानक ' मर्मदृष्टी ' हा शब्द सुचला !

अहो, प्राण कंठाशी आलेला माणूस उड्या मारत, चीत्कारत गाणे म्हणेल का ?

आयुष्याची मुळात खिचडी ! ती चविष्ट करण्याचे प्रयत्न !

तुम्ही म्हणताय ते ब्लॅकमेलिंग -- समर्पण नव्हे --

सुखदुःखे सगळ्यांच्या आयुष्यांत येतात -- पण, मला यश मिळालेय म्हणून मी सत्यनारायण करणार, जोरात गाणी वाजवणार आणि शेकडो लोकांना त्रास देऊन त्यांचा दिवस खराब करणार -- हे समर्थनीय होऊच शकत नाही --

आनंदाचा प्रश्न नाहीय -- मी तुमच्या कानांशी येऊन ओरडत राहणार माझा आनंद -- हा प्रश्न आहे --

सुनील तांबे लिखित : मकबूल फिदा हुसेन..

moklik.blogspot.com

मी एका ठिकाणी दिलेला -- मला जाणवलेला -- त्या सरस्वतीच्या चित्राचा अर्थ --

मुळात हे देवीचे, स्त्री म्हणून काढलेले उत्तान, नग्न चित्र आहे, ही कल्पनाच चुकीची आहे. स्त्रीदेहाचे आकर्षण वा मादकता व्यक्त करणारे असे कोणतेही अवयव तसे रेखाटलेले नाहीत. तो स्त्रीदेह आहे असे सांगण्यापुरतीच रूपरेखा आहे. मुळात सरस्वती ही बुद्धी आणि सखोल ज्ञानाचे प्रतीक आहे. ते ज्ञान खुले, अनावृत आहे. सरस्वतीचा उजवा हात पाण्याबा हेर आल्याचे दाखवले आहे आणि त्या हातात कमळ आहे. हे ज्ञानाचे बाहेर आविष्कृत झालेले सौंदर्य आणि ताजेपण आहे. तो हात पाण्याबाहेर आलेला दाखवणे याचा अर्थच ती सरस्वती ज्ञानाच्या सखोल, वाहत्या प्रवाहात आहे. तिचे केस तिच्या डावीकडून उजवीकडे वाहते, लहरते दाखवलेले आहेत – तेही त्या प्रवाहाचे निदर्शक आहेत. ज्ञान हे स्थितिशील नसते – सतत वाहते, नवे, ताजे असते – हेच यातून सुचवलेले आहे. वरच्या बाजूला एक मासा दाखवलेला आहे. मासा जगतोच मुळी पाण्यातल्या प्राणवायूवर – तो ज्ञानाचा प्राणवायू आहे. माशाच्या त्या ज्ञानग्रहण प्रक्रियेचे निदर्शक असे बुडबुडे दाखवलेले आहेत. इथे वीणा तिच्या मांडीवर आहे. ती कला कौशल्य, नादसौंदर्य, संगीत यांचे प्रतीक आहे. त्या वीणेने सहजच योनीप्रदेश झाकला गेलेला आहे. ही लैंगिकतेला उत्तेजन न देणारी, उन्मादक नसलेली अशी कला आहे. मोर पिसारा फुलवून तिच्या मांडीवर नाचतो आहे. हे ज्ञानाचे फुलणे, आल्हादणे, व्यक्त होणे आहे. या सरस्वतीला व्यक्तिगत चेहरा नाहीय. ज्ञान व्यक्तिगततेच्या मर्यादा ओलांडणारे असते, हेच त्यातून सुचवलेले आहे. तिच्या कपाळावर आज्ञाचक्राच्या जागी कुंकवाचा टिळा आहे. बुद्धी आणि अध्यात्मिक ज्ञान यांचे ते केंद्र आहे. शिवाय ते स्त्रीच्या सौभाग्याचे लक्षण आहे. ती एक पत्नी आहे. पौराणिक संदर्भ धुंडाळून नक्कीच याचेही अधिक अर्थ लागतील. सरस्वती ही ब्रम्हाची पत्नी आहे. उत्पत्तीची, सर्जकतेची, निर्मितीची देवता आहे – हेही त्यातून व्यक्त होते. थोडक्यात, हे चित्र ज्ञानाची सर्जकता व्यक्त

करते. मला यात आक्षेपार्ह तर काही वाटले नाहीच, उलट, या चित्रकाराने या देवतेचे सखोल प्रतिकात्मक अर्थ समजून घेऊन हे चित्र काढलेले आहे, असेच वाटले. यावर वाद झाले तेव्हा कुणी या चित्राचा हा अर्थ सांगितला होता की नाही, ते मला माहीत नाही. एकूणात,चुकीच्या पद्धतीने पाहून, चुकीचे अर्थ लावून, हुसेनांवर अन्याय झाला, असेच मला वाटते.

मला तेच दाखवायचे असते की -- लॉजिक नाहीय --

आयुष्यात असला ' करमणूक कचरा ' वाढवत राहण्यापेक्षा -- धर्म म्हणजे काय, ध्यान म्हणजे काय -- या गोष्टी समजून घेण्याच्या मार्गाने जाणे लाख पटींनी महत्त्वाचे आहे !

मी स्वतःला विचारवंत समजत नाही. उत्सव नाही तर शोकसभा -- यांतले एक निवडायलाच हवे, असे समजणेच चुकीचे आहे.

मला ते ' सामूहिक वेड ' असे दिसत असल्याने ते ' वादाच्या पलिकडचे ' या कॅटेगरीतले आहे !

विक्रीच्या कलिंगडांचे कसे तंबू असतात तसे तंबू आहेत मूर्तींची रेलचेल असलेले !

मानसोपचार परवडणारेही नाहीत आणि इतक्यांना उपलब्धही होणार नाहीत, बुवाबाजी धोक्याची आहे, आणि इथे डोकी नॉर्मल राहणे जमूच नये, असे सर्वांचे कसून प्रयत्न आहेत – त्यामुळे, हे लेसर इव्हिल, आहे त्यांत, कमी धोक्याचे संकट म्हणावे !

माझ्या ९० वर्षांच्या आईला निरनिराळे भास होत असल्याने न्यूरॉलोजिस्टची ट्रीटमेंट चालू आहे. २५ वर्षांपूर्वी वारलेले माझे वडील जिवंत असून ते अमुक ठिकाणी आहेत किंवा हे आमचे घर नसून सामान बांधून आता आपल्या घरी जायचे आहे किंवा मी तिला नकळत कुठेतरी दुसरीकडेच राहायला जाणार आहे -- असे भास तिला होत राहतात. समजावून वा चिडूनही काही उपयोग होत नाही.

मी कुणाच्याच फारसा नादी नाही लागत -- पण त्यामुळे मलाही कुणी ' आपला ' मानत नाहीत --

कोणतेही विशिष्ट नाते याचा अर्थच विशिष्ट बांधणी, विशिष्ट रचना असलेले नाते -- तसे नसणे म्हणजे वैश्विक -- अध्यात्मिक असावे लागेल --

विवाह हे बंधन असणारच कारण ते एक विशिष्ट प्रकारचेच नाते असणार -- किंबहुना, लिव्ह-इन सुद्धा पूर्ण बंधनातीत असू शकणार नाही --

माझ्या परीने थोडक्यात -----शुद्धीकरण म्हणजे कंडिशनिंग ( संस्कारसाठा वा संस्काररचना ) बदलण्याचे समाधान मिळावे असा विधी. हे स्वेच्छेने होत असताना वा भीतीनेही घडणे शक्य आहे. ‘ हिंदू ‘ हे नामाभिधान स्वीकारण्यापुरतेच हे असणार. बाकी व्यक्तिगत राग-लोभ, स्वभाव यांत फारसा फरक पडणार नाही. माणसाची मूळ रचना तशीच राहून काही उथळ बदल घडू शकतील.

आधुनिकतेत वस्तूरूपातली प्रगती आणि वैचारिकतेवर भर हे महत्त्वाचे. परंपरा पाळण्यात प्रश्न विचारण्याला प्रतिबंध असतो. त्यामुळे, हे दोन्ही एकत्र असणे अवघड आहे. तरीही, माणसात अनेक विसंगती एकत्र नांदू शकतात, हे पाहता, सोयिस्करपणे याही दोन्ही गोष्टी बाळगण्याचे ढोंग करत राहता येईल आणि त्याचे ‘ वैचारिक ‘ समर्थन देत राहणेही घडू शकेल.

धर्म ही गोष्ट एक सवयींचा साचा या स्वरूपातच शिल्लक असलेली दिसते. संस्कृतीचीही तीच अवस्था आहे. त्यामुळे, मानवी हिंसेचे सातत्य टिकूनच राहते. धर्म आणि संस्कृतिप्रवाह हे बुद्धी आणि हिंसा यांच्या परे असतात, ही समजूत खोटी पडावी असेच एकूण अनुभवाला येते. त्यामुळे, धर्मासह असो की धर्माशिवाय असो, संस्कृती म्हणजे हिंसक जगण्याचे समर्थन – हेच व्यवहारातले सत्य दिसते.

वसाहतीपूर्वीची निरागसता यावर मला अभ्यासाभावी लिहिता येणार नाही.

आताची वेगाने होणारी सरमिसळ आणि माध्यमांमुळे होणारे सपाटीकरण पाहता शहरांशिवायची खेडी हे अशक्य दिसते.

‘ व्यक्तिशिवायचा समाज ‘ हा एक अतिमहत्त्वाचा विषय आहे. सामाजिकतेचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्वांनीच ही भ्रामक कल्पना जोपासलेली, फुलवलेली दिसते. व्यक्ती आणि समाज यांतले द्वंद्व कितपत खरे आहे याचाही कुणी शोध घेत नाही.

‘ नेमकेपणाशिवायची अडगळ ‘ नव्हे – ‘ नेमकेपणामुळे अडगळ ‘ – असे खरे तर ते आहे. एखाद्या लेखकाचे ललित लेखनही त्याच्या बौद्धिक साच्यातून, मतांतून, पूर्वग्रहांतून होत असेल तर ते पूर्ण मानवाला जगण्याची समजूत देऊ शकेल अशा परिपक्वतेला पोचू शकत नाही. अशा लेखकाची सर्व विद्वत्ता आणि हुशारी ही अंतिमतः अडगळच ठरते.

जातिव्यवस्था आणि उतरंड उभी की आडवी हा निव्वळ वेडगळपणा आहे. एकदा ‘ अलग ‘ ओळखी ( आयडेंटिटीज – समरूपता ) पक्क्या झाल्या की त्या विखारमयच असणार. नुसत्या वस्तुस्थिती ( फॅक्टस ) अशा असूच शकणार नाहीत. असो.

नेमाड्यांचे लेखन ही मराठी साहित्यातली एक शोकात्मिकाच आहे – एवढी प्रचंड विद्वत्ता, मेहनत, हे सगळे, समावेशक भानाच्या अभावी अडगळ ठरणे – या अर्थाने वायाच जाणे !

माझ्या एका नाटकात एक वाक्य आहे -- " स्त्रियांना मार्गदर्शन करणारा पुरुष हा एक तर वेडा असतो किंवा त्याला स्त्रियांची काहीच माहिती नसते ! " -- तेच समीक्षकाबद्दलही खरे आहे ! समीक्षकाने या बाबतीत कोणत्या मुद्यांची दखल घ्यावी ( असे वाटते ) ते फक्त बोलता येईल --

होय -- ildc.in वर ते फ्री उपलब्ध आहे -- उत्तम आहे --

ज्या दिवशी विश्वामित्राने कुत्र्याचे मास खाल्ले होते ( असेच काही आहे ना ? ) त्या दिवशी वर्षातून एकदा सर्वांनीच तसे करायला हवे -- भटकी कुत्री आपोआप कमी होतील --

एखाद्या विचारसरणीमुळे तरी लोक कुठे नैतिक वागताहेत ? आणि नैतिक म्हणजे काय ?

मारुती शिवरामपंत कांबळी यांचे असे काहीसे एक वाक्य आहे -- मानवी प्रश्नाकडे टक लावून पाहू नका -- सहज पाहा --

माझे ' दिनकर पुरोहितचा खून ' हे नाटक संजय पाटलांनी अत्युत्तम दिग्दर्शित केले होते -- त्याच्या आठवणी अजूनही ताज्या आहेत !

धन्यवाद ! ' गतकातरता ' हा शब्द मला आठवत नव्हता --

' जणू काही वास्तव ' हे माझे नाटक गिरीशने ' आविष्कार ' साठी दिग्दर्शित केले होते.

सगळे निस्पृह आहेत समजा -- पण, निवडणुकीत खूप पैसा लागणे, खऱ्याखोट्या घोषणा लागणे, धाक वापरला जाणे -- हे सगळे काय आहे ? ही कसली लढाई कशाने लढणे आहे ? मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होण्याच्या कारणांतही पुढली निवडणूक जिंकून भारताचे हित करायचे आहे -- हेही एक कारण असू शकतेच !

हितसंबंधांचा विषय आला की ती लढाईच ठरते --

आधीच कविता -- त्यात व्यथांच्या !

समजून घ्यायला चालना म्हणून सुभाषित ठीक आहे पण आधी सुभाषित आणि मग त्याला धरून जगणे, असे केल्यास जगण्याची वाट लागेल ! ( हेही एक सुभाषितच ! )

काही काळापूर्वी हिंदी सिनेमांची गाणी खूप सुभाषितमय असायची -- ' जिंदगी ' वा ' दुनिया ' यांतला एकही शब्द नसलेले गाणे सापडणे मुश्किल असायचे !

तेंडुलकरांच्या ' बेबी ' या नाटकात सुभाषितांची चांगलीच तासण्यात आलेली आहे !

इंग्रजीत प्रत्येक लेखकाची ढिगाने आहेत सुभाषिते ! त्यांनाही घ्या तुमच्या पुढच्या लेखात !

व्यक्तिगत संदर्भ वगळून बोलण्याच्या नादात त्याचे सुभाषित होत असावे !

मित्र हो, भाषांतराचा अट्टहास नाही -- पण, भाषेचे प्रेम असल्यामुळे प्रतिशब्द शोधणे, समानार्थी पर्याय पाहणे, वेगळे शब्द विचारात घेणे, नवे शब्द घडवणे -- असे अनेक खेळ खेळले जात राहतात. आपली भाषेची समज यातून थोडीफार वाढत असावी, असे वाटते.

बहुतेक तो शब्द ' गतकातर ' हा होता ! आता मला आणखी एक सुचतोय तो म्हणजे ' गतव्याकूळ ' किंवा ' गृहव्याकूळ ' -- Nostalgic आणि homesick.

अशा समरूपतेमुळे आनंद निर्माण होतो की भ्रम आणि संघर्ष ?

समरूप होण्याची गरजच काय -- असा प्रश्न आहे --

जो जो यात भाग घेतोय त्या त्या प्रत्येकाला वाटतेय ( किंवा तो असे दाखवतोय तरी ) की सत्य त्याच्याकडेच आहे !

निरर्थक विद्वत्ता, उपरोध आणि कुचेष्टा ! -- ही नेमाड्यांची हत्यारे !

देशीवाद, वास्तववाद -- हे वैचारिक साचे आहेत की नाहीत ? की फक्त साम्यवाद, हिंदुत्ववाद -- हेच वैचारिक साचे असतात ? -- हे स्पष्ट व्हायला हवे. ' जातींची रचना आडवी असावी -- उभी नको ' -- ही विचारसरणी नाही ? निरर्थक का असे ना ! -

- जागतिकीकरण वाईट आहे, असे मांडणे -- हे काय आहे ? कोणत्या ना कोणत्या बौद्धिक निष्कर्षांना सत्य मानून लिहिणे म्हणजे विचारसरणीचे लिहिणे. स्वतःचे तेच चालू आहे, हे समजत नाही ? गाओ झिंगझिआन जेव्हा विचारसरणीचे बंधन झुगारून देतो तेव्हा त्याच्या नोबेल भाषणात त्याचे नीट स्पष्टीकरण असते. आयुष्यभर ढोर विद्वत्ता जमा करत राहणे आणि फुटकळ शेरेबाजी करणे यांवर जे मोठे ' राव ' झाले त्यांनी असा ' आदेश ' देणे ही एक चेष्टाच म्हणावी लागेल.

ग्लोबलायझेशन रद्दच करायला सांगितलेय त्यांनी !

बऱ्याच अभियंत्यांना इंग्लिश नीट येत नसल्याने चांगल्या ( म्हणजे जास्त पगाराच्या ) नोकऱ्या मिळत नाहीयत -- अशी आजच एक बातमी आलेली आहे.

खानोलकर आणि मी एकदा शांताबाईंबरोबर टॅक्सीने चर्नी रोड ते दादर असे गेलो होतो -- त्यांच्या घरी. तेवढ्या वेळात आणि त्यांच्या घरीही झालेल्या गप्पांत त्यांचे पाठांतर आणि स्मरणशक्ती पाहून अचंबित झालो ! स्वतःच्या तर सगळ्या कविता त्यांना पाठ असतच पण इतरही अनेकांच्या कविता व गीते पाठ असत ! शब्दांवर प्रेम करणाऱ्या ग्रेट विदुषी !

मला वाटते की नुसते पॅटर्नस, नुसत्या रचना -- त्या निसर्गनिर्मित असोत की मानवनिर्मित -- त्यांना कलाकृती म्हणता येणार नाही. मानवी संबंधांचे आकलन आणि भान यांतूनच कलाकृती घडते --

एक आठवण -- साहित्य संघात खानोलकरांच्या ' सगेसोयरे ' या नाटकाची तालीम चालू होती. अरविंद-सुलभा देशपांडे आणि इतर बरेच होते. मी तालीम पाहायला गेलो होतो. एका अंकाची तालीम झाल्यावर सर्वांसाठी तिखट-मीठ लावलेल्या काकड्या आणल्या होत्या. त्याच वेळी भालचंद्र पेंढारकर तिथे आले. सर्वांनाच त्यांच्याबद्दल आदर होता. त्यांनाही काकडी देऊ करण्यात आली -- पण, नाही म्हणजे नाही -- त्यांनी एक तुकडाही घेतला नाही. आवाजाची १०० टक्के काळजी घेत ! -- त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

चिं. त्र्यं. खानोलकर यांची ' एका स्वामीची महायात्रा ' ही कथा आठवतेय का कुणाला ?

तुम्ही अपराधी भावनेने केले तर ॲब्नॉर्मल ! यासाठी, सार्त्रचे ' फ्लाईज ' हे नाटक वाचा -- पूर्ण क्लॅरिटीचे नाटक !

कवितेतला ' मी ' म्हणजे ती लिहिणारा मी, असे समजून चालू नये --

आणि सारखे तीव्र राग-लोभाचे प्रसंग आणून, इथली सगळी माणसे हायस्ट्रंग आहेत, असे बिंबवले जाते -- पाहणाऱ्यांची डोकी बिघडतात !

डॉक्टरी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वेड्यांचे इस्पितळही दाखवले जाते. तसे, काही विद्यार्थी ते पाहात चालले होते. तिथल्या रुग्णांनी केलेल्या / वाढवलेल्या बागेकडे पाहात ते चाललेले असताना एक वेडा हातात एक गुलाबाचे फूल घेऊन एका विद्यार्थ्याकडे आला आणि हसतमुखाने त्याला ते देऊ लागला. विद्यार्थी जरा बावचळला -- " नको, नको " म्हणू लागला. " घ्या ऽऽ " वेड्याने जोरात दरडावले. तेव्हा, तिथले सीनियर डॉक्टर त्या विद्यार्थ्याला म्हणाले " अरे, घे, घे -- काळजी नको -- प्रेमाने देतोय तो ! "

२२ सालापर्यंत भारत लोकसंख्येत चीनला मागे टाकून जगात नंबर वन होईल !

वाङ्मय -- मराठी असो, इंग्रजी असो -- पदवीठी अभ्यासाला घेण्यात होणारी सर्वात मोठी स्वतःची कोणती फसवणूक होत असेल तर ती म्हणजे -- सुमारे ८० टक्के फालतू अभ्यासत बसावे लागते ! कवितेचेही तेच असणार !

जेकेंची भाषा अत्यंत सोपी आहे. शब्दकोशाची गरज खूप कमी.

ते सगळे ठीक आहे -- एक मुख्य काळजी घ्या -- माझ्या माहितीत एक उंदीर असा कारच्या आत मेला होता आणि एसीतून त्याचे जंतू आले वाटते -- त्याने संबंधित व्यक्तीला आजारपण आले -- वास येऊ लागल्यावर ते कळले ! उंदीर जिवंत बाहेर पडले पाहिजेत, हे बघा --

मी माझेच डोके --मन -- उलटेपालटे करून बघतो -- तोच माझा अभ्यास --

मराठी शब्दकोशात ' मतमतांतर ' याचा अर्थ -- भिन्नभिन्न मते -- असा दिलेला आहे.

वर्गणी, मंडप आणि लाऊडस्पीकर नसेल तर ' पुण्य ' शून्य ! कशाला कोण इंटरेस्ट घेईल मग ! ?

माझ्या मते सत्य, आणखी कुणाच्या मते असत्य !

कोणतीही मानवी रचना वा संस्था, झाडावरून फळ खाली पडावे तशी परस्पर वस्तूरूप चालत नाही. सर्वच माणसांची मने -- स्वार्थ, शंका, संशय आणि दबाव व इच्छा यांच्या गोंधळातूनच चालत असतात. त्यामुळे, अनेक बाजू, अनेक मते ही नेहमीच असणार. छुप्या हेतूंचे खरे वा खोटे आरोप होण्याची शक्यता नष्ट कशी करणार ? न्यायालयात वाद-प्रतिवाद यांच्या बाहेरचेही डाव खेळले जातात -- त्यावर काय उपाय ? माणसांची मने खत्रुड असतात, हे सत्य वगळून यातले काहीच समजू शकणार नाही.

काहीही करायचे म्हटले, कोणतेही निर्णय घ्यायचे म्हटले की साधन बुद्धीच असणार. बुद्धी तुकड्या तुकड्यांतूनच काम करते -- समावेशक असू शकत नाही -- बऱ्याच गोष्टी बुद्धीच्या अंदाजात वा आवाक्यात न येणे हे नेहमीच घडत राहते. म्हणून, त्या त्या वेळचे प्रश्न समजून घेऊन त्या त्या वेळी आवश्यक ते निर्णय घेत जाणे -- ते नेहमीच अमुकच विचारसरणीला धरून असले पाहिजेत, असा आग्रह न धरणे. ही समन्वयाची पद्धत. तीही पूर्ण बरोबर असेल, असे नाहीच. पण पोथीनिष्ठतेइतकी घातक असणार नाही, असे वाटते.

बँकेतून एका कर्जदार स्त्रीला पत्र चालले होते -- " यू हॅव पुट अस इन ऍन एंबॅरॅसिंग सिच्युएशन " च्या ऐवजी " एंब्रेसिग सिच्युएशन " झाले होते टाइपिंग करताना --

सुभाषिते आणि वास्तव यांतली प्रचंड दरी !

आपले तुकाराम महाराजही म्हणून गेलेत -- " शुभकाळ अवघ्या दिशा ।। "

काही चॅनेल्स म्हणताहेत की आम्ही लाईव्ह दृश्ये दाखवत नाहीय -- पण, तरीही, माहिती मात्र सगळी मिनिटामिनिटाची दिली जातेय -- सुरक्षेचे चाललेले सर्व प्रयत्न, हालचाली, काय केले आहे, काय करण्याचा प्रयत्न आहे -- हे सगळे !

लिव्ह इन ला कायद्याने विवाहाचाच दर्जा असणार ( वारसा हक्क, वगैरे बाबींमध्ये ) असे वाचनात आले होते -- याचा अर्थ एक वैवाहिक साथीदार आणि एक लिव्ह इन साथीदार -- असे चालणार नाही, बहुतेक -- तो द्विभार्या प्रतिबंधक कायद्याचा भंग होईल. त्याचप्रमाणे द्विपती प्रतिबंधक कायदाही आहे का ?

इकडेतिकडे पाहावे, कानोसा घ्यावा, कोण काय म्हणताहेत --वेळ जाऊ द्यावा, मग ' बरे ' म्हणावे, असा कद्रूपणा करायला मी समीक्षक थोडाच आहे ? खरे तर थोडेही काही चांगले दिसले तर समीक्षकाचे लक्ष तर जायलाच हवे, त्याने इतरांचेही तिकडे लक्ष वेधायला हवे. रामचंद्र वामन कदम या अत्युत्तम कवीच्या बाबतीत ते घडले नाही. असो. Irshad Bagwan -

- यांची ही पोस्ट वाचली आणि थक्क झालो ! हा नक्कीच मराठीतला एक मौल्यवान लेखक आहे ! ईर्शादजी, लिहीत राहा -- तुम्ही वेगळे आहात !

' अक्षरवाङ्मय ' हे त्रैमासिक डॉ. नानासाहेब सूर्यवंशी यांच्या संपादकत्वाखाली अहमदपूर इथून निघते. आपले इथले एफबी मित्र डॉ. अरुण प्रभुणे त्याचे सल्लागार आहेत. पत्ता -- ' प्रणव ', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, तालुका -- अहमदपूर, जिल्हा -- लातूर --४१३५१५. मो नं -- ९४२३६५५८४१.

हे झाले की पुढचे स्वप्न, मग तिसरे स्वप्न -- अशी फरफटही चालू द्यावी, हवी तर, पण, माणसाच्या मनातच काही खोट आहे का, हा प्रश्नही विचारावाच लागणार. कॅन्सर कुठे आहे, हे बघायचे टाळण्यात काय मतलब ? अशा भीतीमुळेच उलट ' आहे ते चालू ' राहते !

माणसे माणसांचे शोषण जात, भाषा, धर्म, वंश, वर्ण, राष्ट्र, पैसा आणि सत्ता अशा अनेक शक्तींनी करत असतात. तत्त्वज्ञाने येतात, जातात – यांतल्या कोणत्या ना कोणत्या शक्ती वापरत शोषण चालूच असते !

" आता आम्हाला शोषक व्हायचे आहे " असे म्हटले तर आधी ज्यांना संधी होती ते शोषक ' बरोबर ' ठरतात आणि त्यांच्याविरुद्धचा राग बोथट होऊ शकतो -- त्यामुळे, अशी भूलथाप अटळ गरज बनते !

शेरिडन हा नाटककार एकदोन नाटकांवर टिकून असतो, बेडेकर खरे तर ' रणांगण ' या कादंबरीवरच टिकून आहेत. कवितेच्या बाबतीत मात्र एखादा संग्रह तरी निघावा लागतो, असे दिसते ( शेवटी त्यातल्या ४-५ कविताच महत्त्वाच्या असेनात का ! ) मूल्यमापनाच्या अनेक पद्धती असू शकतील. कुणी सामाजिक बांधिलकीला महत्त्व देईल तर कुणी समग्र भानाला. याहून सविस्तर बोलणे इथे जमणार नाही.

ती बीभत्सताच आता कार्यकर्ते आणि पुढारी तयार होण्याची भूमी झालेली आहे !

" तुमची सत्ता असलेल्या अमुक ठिकाणी तुम्ही किती खाल्लेत, ते काढू का ? " -- अशा चर्चा ऐकतोच ना आपण टीव्हीवर !

जगात कोट्यवधी लोकांचे कोट्यवधी अनुभव आहेत -- तितकीच आकलनेही आहेत -- हे पाहता, एकाही महान कलाकृतीच्या संपर्कात न येणारा आणि दहा लाख कोटींच्या संपर्कात न येणारा यांत फरक काय ?

विचार तुकड्यांचे असतात -- समावेशक असू शकत नाहीत --

विचार ही एक खंडित गोष्ट असते -- परिणाम खंडितच होणार --

गोली मार भेजेमें
भेजा शोर करता है

आयला, कमाल आहे किरण ! बालपणातला देवानंद आपण साकारावा, असे खरेच माझे, अर्थात बालपणी, स्वप्न होते !

अजाणतेपणीही किती विनोद करतात स्त्रिया ! जाणतेपणी तर विचारूच नका !

वॉकरशिवाय ! -- या आपल्या संवादाची पोस्टच दिली बघ -- ( चालायचे नसेल तेव्हा जॉनी वॉकर ! )

होय ! करेक्ट ! एकदा कोल्हापूरचे पाणी प्याला की मेंदू तिथेच तर उतरतो ! आणि खुमखुमी वाढल्याने भीती जाते -- हा दुसरा फायदा ! कदाचित ' कळणे ' च कमी झाल्यानेही भीती जात असावी !

चालणे बरेच वाढवलेय -- कोणत्याही आधाराशिवाय -- पण, अजून तरी आमच्या सोसायटीच्या आवारातच --

किरण, अरे दोन्ही गुडघ्यांचे सांधेरोपण झालेय -- दीड महिना होऊन गेला -- आता खूप प्रगती आहे --

जरा मेंदूला व्यायाम !

स्वतःची मते, धारणा, संस्कारबद्धता यांच्या पकडीतून सुटलेला कलावंतच सर्जक कलाकृती निर्माण करतो -- तशा नसलेल्या कलाकृती या खुज्या -- असर्जक असतात -- हे जर बरोबर असेल तर सर्जकतेची ही प्रक्रिया जगण्याच्या सर्वच क्षेत्रांना लावायला नको का ? -- असा हा प्रश्न आहे.

यासाठीच मी एक प्रश्न विचारला होता -- लिहिलेली प्रत्येक कविता सर्जकतेतून आलीय, असे म्हणता येते का ?

कडवेपणा म्हणजे एक तीव्र वैचारिक स्थितिशीलता -- तीव्र प्रतिक्रियात्मकता -- व्यक्तिगत वा समूहाच्या हितासाठी असणारी हिंसात्मकता. त्याचप्रमाणे, कोणतीही तीव्र अस्मिता, वैचारिक हेकटपणा, सहानुभूतिशून्य वा इतरांचे स्वातंत्र्य नाकारणारा आत्मकेंद्रीपणा वा अहंकारीपणा, व्यक्तिगत वा सामूहिक रागलोभातून येणारा आक्रमकपणा.

Champra Deshpande commented on his own post.
आत्मघातकी हल्ला करणारा, विचारसरणीसाठी कत्तल करणारा, पंथीय, भाषिक वा प्रादेशिक अस्मिता बाळगून संघर्ष करणारा -- हे सगळे कोणत्या अर्थाने सर्जक म्हणता येतील ?

" तुमचे निष्कर्ष तुमच्याशिवाय कोणालाच बंधनकारक नाहीत. " -- मारुती शिवरामपंत कांबळी. इथे ' तुम्ही ' म्हणजे कडवी व्यक्ती वा समूह, असा अर्थ. कडवेपणा हा बऱ्याचजणांना वगळणारा असतो -- पर्यायाने स्थितिशील, विध्वंसक आणि असर्जक असतो -- असे का म्हणू नये ?

आणि पुन्हा माझा कालपरवाचाच मुद्दा -- एखादा माणूस काही निष्कर्षांना बांधील असण्याची मनःस्थिती सर्जक असू शकते का ? ( कलावंत निर्मितीच्या वेळी त्याच्या निष्कर्षांतून बाहेर असणे -- ही सर्जकता -- असे मी मांडले होते. )

इतरांना दडपणे, दंगली घडवणे, उर्मटपणा वा घमेंड बाळगणे -- या गोष्टींना सर्जक म्हणता येईल ?

धार्मिक वा वैचारिक कडवेपणातून काही ना काही घडतेच -- घडणे म्हणजेच सर्जकता ?

म्हणजे, समजा, मी धार्मिक कडवा आहे तर तो कडवेपणा सर्जक नसतो पण त्यातून किंवा त्याच्यामुळे मला ( की दुसऱ्याला ? ) सर्जकतेची प्रेरणा मिळते -- असे आहे का म्हणणे ?

होय -- आता खूपच सुधारणा आहे -- वॉकरशिवाय चालत आहे --

अरे, सॉरी, गणेश, मला माझी एडिटेड कॉमेंट टाकायची होती म्हणून मी पहिली डिलीट केली तर त्यात तुझे उत्तरही गेलेले दिसतेय. असे होईल, हे मला माहीत नव्हते. तुझ्याकडे ते उत्तर असेल तर, वाटल्यास माझी एडिटेड कॉमेंट पाहून, इथे दे, प्लीज !

गणेश, तू लिहितोयस ते उत्तमच आहे आणि मीही ते आवडीने वाचतो आहे -- त्यातून तुला अपेक्षित तेच माझ्या विचारात घडत असो की नसो. कलावंताचे व्यक्तिगत चरित्र आणि चारित्र्य हे तपासत त्याच्या सर्जक कृतींचे अर्थ लावावेत का याबद्दल अनेकांत मतभेद असल्याचे तुलाही माहीत असेलच. त्यामुळे, तुझ्यामाझ्यात झाला मतभेद तरी काही बिघडत नाही. असे घडत राहणारच. शेकडो कलावंतांचे चरित्र उपलब्ध नसते. तरीही त्या कलाकृती संपर्क साधत असतातच. नाटकांबद्दल बोलायचे तर शेक्स्पियर, पिरांदेलो, आयनेस्को, बेकेट या सर्वांची व्यक्तिगत संस्कारबद्धता काय, कशी होती, हे फारसे कुणाला माहीत नसते. शिवाय, आपण स्वतः स्वतःला समजणे कधी होत नाही तर दुसरा कोण कुणाला कितपत कळू शकेल, असे प्रश्न असतातच. म्हणजे काहीच समजून घ्यायची गरज नाही का ? तसेही नाही. काही शब्दार्थ, संदर्भ, पूरक कथा – हे सगळे नक्कीच उपयोगी पडेल. तुझ्या लेखनाचा उपयोग आहेच -- जरूर, ते मलाही महत्त्वाचेच वाटते. पण कोणत्याही कलाकृतीच्या आकलनाबाबत ‘ अमुकच ‘ असे आग्रही राहता येत नाही. चांगला लेखक त्याच्या संस्कारबद्धतेच्या मर्यादा ओलांडत असतो, असे माझे म्हणणे आहे. आणि दुसरे म्हणजे एखाद्या कलाकृतीची महात्मता अनेकांना जाणवणे, हेही एकसारखेच असेल, असे नाही. शेक्स्पियरच्या नाटकांचे अनेक अन्वय अनेक प्रकारांनी सादर होत आलेले आहेत. महाभारताचेही तसे आहे. कालिदासाचा मला जाणवलेला अर्थ शून्यवादी म्हणावा का, हा प्रश्न सोडून देऊ – समज, मला शून्यवादीच जाणवतेय त्या कलाकृतीची महात्मता, तर कालिदास शून्यवादी होता का, याची चौकशी मी का करावी ? ( आणि तसा समजा घेत गेलो मी शोध आणि तो शून्यवादी होता की नव्हता यावर विद्वानांचे मतभेद सापडले, तर वाटच लागणार ! ) कालिदास हा एक झाला – असे खूपच असणार ग्रेट लेखक. अमुकच अर्थाबाबत आग्रही राहण्याचा तसा उपयोग नसतो. आणि तुझ्याच या पोस्टमधले शेवटचे वाक्य बघ.-- " आणि कमाल म्हणजे जग शेवटी अनेक निरर्थक असत्यांना बळी पडते असे म्हटले आहे . ( संधर्भ : रघुवंश : अज विलाप ) " -- हे किती गोष्टींची चर्चा करायला भाग पाडेल ते बघ. न जाणो, शेवटी ते शून्यवादाकडे जाईल !

उमेश, हेच तर वैशिष्ट्य आहे कलेचे -- जे भान अध्यात्मिक लेखनातून देण्यासाठी संत असावे लागते, तेच भान कलेतून अ-संताकडूनही निर्माण होऊ शकते ! ( कोण किती नालायक, किती लायक हे फारच विवाद्य असते ! )

मला ही गोष्ट माहीत नव्हती. प्रत्येक गोष्टीची कारणमीमांसा सांगणारी आत्मविश्वासी माणसे मला निरर्थकच वाटतात. कारण मी कालिदासाकलन महत्त्वाचे मानतो. आता ही कारणमीमांसा बघा, इथे त्या मुंगुसापर्यंत जाते ! हे ग्रेट आहे ! -- अशीच ही कारणांची गुंतागुंत खूप असू शकते -- म्हणजेच -- सगळेच एकत्रच असते -- या अकल्पित सत्यापर्यंत हे जाऊन पोचते ! ग्रेटच !

‘डावेदार’

loksatta.com

धन्यवाद, गिरीश !

फारच उदबोधक ! ' तुमची विचारसरणी तुमच्या जनुकरचनेवरून ठरते ' हे मी एका मानसशास्त्राच्या पुस्तकात वाचले होते !

पावसाळ्यांच्या हिशोबात शहाणपण सांगितले जाते ते वेगळेपणामुळे -- समानतेमुळे नव्हे --

पीटर शेल्डालच्या ओळी --
बहुधा मी बाळगत नाही माझी मते
काही तासांहून अधिक काळ --

योग, ध्यान यांचे महत्त्व शास्त्रसिद्ध असल्याने ते विवाद्य असायचे कारण नाही. हिंदुत्ववाद्यांनी त्याचे धार्मिक गर्वात रूपांतर करणे नको आहे. हे ठीकच आहे. अशा परिस्थितीत, त्या गर्वाला विरोध करत, सर्वांना -- म्हणजे कम्युनिस्ट, समाजवादी, काँग्रेस, इतर बुद्धिप्रामाण्यवादी, अशा सर्वांना -- हा योग-दिन आपापल्या पद्धतींनी साजरा करता येईल. सर्वे सन्तु निरामयाः -- हे तर मान्यच आहे ना ?

'"If I am what I have and if I lose what I have who then am I?" - Erich Fromm'
मनःपूर्वक भरपूर शुभेच्छा !

मुंबईची वाट लागल्याच्या बातम्यांनी सगळी चॅनेल्स तुंबलीयत !

-- हे तुम्ही एक मत मांडत आहात, असे वाटते -- मी माहीत नसेल तिथे ' माहीत नाही ' असे म्हणतो --

-- होय -- मनाचे काम इगो कमीजास्त होणे -- सुखावणे-दुखावणे -- असेच चालते -- इगो लीन होण्याचे सुख कुणाला मिळत असेल, कोण जाणे !

विशेष म्हणजे, " चांगले दिले की लोक पाहतातच ! " -- हे तत्त्व असे सर्वच ' यशस्वी ' सांगत असतात !

' बदलते स्त्री-पुरुष संबंध ' -- असे सूत्र होते --

-- म्हणजेच माहिती / अनुभव यांचा आणि जगण्यातल्या / संबंधांच्या प्रश्नांचा काहीही संबंध नाही -- हे कळणे ! हे महत्त्वाचेच !

-- अहो, माझे ऑपरेशन झालेले असल्याने अजून मी बाहेर पडत नाही --

-- मी हेतूप्रधान जगण्याचा पुरस्कार करत नाहीय -- घटना खूप माहीत असण्याचा आणि शहाणपणाचा काही संबंध नाही -- इतकेच --

या पोस्टचा मुख्य रोख घटनात्मकतेत रमणाऱ्या ललित साहित्याकडे होता पण, एकूणही ठीकच आहे --

-- काय करायचे हा वेगळा प्रश्न आहे -- ते समजत नाही म्हणून डोक्यात नुसते काही ना काही भरत बसायचे ?

-- कितीही माहिती डोक्यात भरली तरीही स्वतःला कोंडून जगणेच चालू आहे ! काय मोठे सांस्कृतिक आणि शहाणपणाचे जगणे दिसतेय ?

सगळेजण डावपेचच खेळत असतात-- हा निष्कर्ष असल्याने, प्रत्येकजण आपापल्या कल्पनेने इतरांच्या डावपेचांची चित्रे रेखाटत बसतो ! असे चित्रकार स्वतः बऱ्याचदा अत्यंत बालिश असतात !

मुळात घटनांच्या बाबतीत सर्वज्ञता शक्यच नाही, हे एक, आणि दुसरे म्हणजे कितीही घटना पाहिल्या, वाचल्या तरी विशेष काही घडत नाही -- फार तर पवित्रे जरा बदलू शकतात ! तसे नसते तर पावसाळ्यांच्या हिशोबात माणसांना कमीअधिक शहाणपण आले असते !

Champra Deshpande commented on Chitra Rajendra Joshi's post.
गाणे ऐकताना आपण ते स्वतःच्या मनःस्थितीत मर्यादित न करणे -- छान विवेचन ! धन्यवाद !

बाबूजी धीरे चलना, प्यार में ज़रा संभलना

हा बड़े धोखे हैं, बड़े धोखे हैं इस राह में

क्यो हो खोये हुये, सर झूकाये
जैसे जाते हो सब कुछ लुटाये
ये तो बाबूजी पहला कदमmaj है
नज़र आते है अपने पराये

ये मोहब्बत है ओ भोलेभाले
कर ना दिल को गमों के हवाले
काम उल्फ़त का नाज़ूक बहोत है
आ के होठों पे टूटेंगे प्याले

हो गयी है किसी से जो अनबन
थाम ले दूसरा कोई दामन
जिंदगानी की राहें अजब हैं
हो अकेला तो लाखों हैं दुश्मन'

-- हे गाणे एका विवाह समारंभात लावले होते !

फ्रेंडस, फिजिओथेरपी व्यवस्थित चालू आहे -- माझ्या वेदना कमी होत आहेत -- बरीच सुधारणा आहे -- पूर्ण बरे होण्यास आणखी काही काळ लागणारच --

विचार निर्णयाला पोचतच नाही -- उत्स्फूर्तताच म्हणते की हा निर्णय !

वैचारिक उन्मत्तपणा शून्य किंमतीचा असतो -- हे समजणे म्हणजेच नम्रपणा !

त्या रागाचे परिणाम स्वीकारायचे -- एरवी तरी बोंबलायला काय टाळता येतेय ?

या प्रश्नातच उत्तर आहे -- कोणताही एक चष्मा सत्य असू शकत नाही !

मरणाचे स्मरण असावे ।

'चैतन्य ताम्हाणेला कोर्ट सिनेमासाठी सुवर्ण कमळ'
अभिनंदन !

माणूस हा प्राणीच आंतरविरोधांनी बरबटलेला, गोंधळलेला, विकृत आणि हिंसक प्राणी आहे, हे एकदा पाहिले तर, हा नीच, तो क्रूर, हा खोटारडा, तो हलकट वगैरे भेदभाव करावे लागणार नाहीत !

बाळ गाडगीळ.

होय ! द्वेष ही एक वाया जाणारी शक्तीच तर आहे !

सध्या मी सगळे काम गुगल क्रोमवर करतो -- तिथे काहीच प्रश्न नाहीय --

मी सिडॅकचे जिस्ट वापरतो.

बाळ, कुमार, किशोर -- ही नावेही -- उदा बाळ आजोबा !

आपण सगळे जसे गुणदोषयुक्त असतो तसेच हे आतला आवाजवाले आणि विवेकवाले असतात. दोघांकडेही खास, वेगळी, निर्दोष, शुद्ध अशी कोणतीही अपवादात्मक शक्ती नसते, एवढेच इथे म्हणायचे आहे.

' आतला आवाज ' असो की ' विवेक ' असो -- दोन्ही स्वभावबद्ध आणि दृष्टिकोणबद्धच असतात ! तरीही, आतल्या आवाजाचीच फक्त टिंगल करायची पद्धत रूढ आहे !

मानसिक गोंधळ, दुःखे पुसायला कुणी तयार होणार नाही -- तसे झाले तर ओळखच संपेल !

रोजच्या जगण्यातला आपला खत्रुडपणा सगळीकडेच दिसतो, हेच खरे !

कुणी त्याला ' आतला आवाज ' म्हणतात, कुणी ( जणू महान सत्य असल्याप्रमाणे ) ' विवेक ' म्हणतात !

मला आता असे वाटतेय की हा विनोद सविस्तर समजावूनच द्यावा !

( विवाहबाह्य प्रेमिक भेटतात. )

प्रियकर -- कशी आहेस ?

प्रेयसी -- मी ठीक आहे -- तू कसा आहेस ?

प्रियकर -- मीही ठीक --

प्रेयसी -- आणि कशी आहे तब्येत आता वहिनींची ?

( प्रियकर मटकन खाली बसतो ! )

विनोदाचे विश्लेषण करायचे नसते हो ! अशाने गंमतच जाते सगळी !

विनोदाकडे विनोद म्हणूनच पाहावे -- खेडे-शहर असा गंभीर संघर्ष त्यातून निर्माण करू नये, ही नम्र विनंती !

अलिकडेच वाचलेला एक विनोद -- खेड्यातल्या मुलगा-मुलगी पाहण्याच्या कार्यक्रमात त्या दोघांना थोडे स्वतंत्रपणे खाजगीत बोलू द्यायचे ठरते. मुलगी मुलाला विचारते, " दादा, तुम्ही किती बहीण-भाऊ ? " तो म्हणतो, " भाऊ एकच आहे, पण, बहिणी दोन होत्या, त्या आता तीन झाल्या ! "

' ताई ' म्हणायला हिंमत का लागते, हा एक कळीचा प्रश्न दिसतोय !

तसले टीकाकार म्हणतात तसे अपेक्षित, स्वच्छ मानवी मन कुठे असू शकते का, हा साधा प्रश्नही त्यांना पडत नाही !

'अभिनय, कल्याण निर्मित

ए, आपण चहा घ्यायचा?

रविवार दि. २५ ऑगस्टला सायं ६:३० ला.

आदित्य प्रतिष्ठान,

अभिनय कट्टा, जिजामाता उद्यान,

भास्कर कॉलनी, नौपाडा,

Ashish Telavane and Neha Ashtaputre Got Engaged

'अभिनय, कल्याण निर्मित

ए, आपण चहा घ्यायचा?

रविवार दि. २५ ऑगस्टला सायं ६:३० ला.

आदित्य प्रतिष्ठान,

अभिनय कट्टा, जिजामाता उद्यान,

भास्कर कॉलनी, नौपाडा,

ठाणे (प.)'

मला तर शुद्धलेखनातून आलेल्या भावना अधिकच तीव्र वाटतात !

शरीर आणि मन या शास्त्रीय दृष्ट्याही वेगवेगळ्या गोष्टी नसल्याने, मानसिक प्रतिमाभंजनालाही ' भ्याड ' हे विशेषण लावावे का, असा एक प्रश्न येतो -- उदाहरणार्थ -- भ्याड चारित्र्यहनन, भ्याड टवाळी, भ्याड कुत्सितपणा, वगैरे.

-- तुम्ही म्हणताय तो मुद्दा वेगळा आहे. भीतीमुळे भूमिका न घेणे वेगळे. जगण्याचे पूर्ण आवाक्याचे भान घेताना भूमिका अशी शिल्लकच नसते -- हा आहे विषय.

( काही साहित्यकृती या वैचारिक लढाई कलेच्या माध्यमातून लढणाऱ्या असतात -- त्या भूमिका घेणार, हे उघड आहे -- पण, काही साहित्यकृती या जगण्याच्या पूर्ण रचनेचे भान घेणाऱ्या असतात -- त्या कोणतीच वैचारिक लढाई लढत नसतात. दोन्ही प्रकारांना वाव असला पाहिजे. ' भूमिके ' बाबत नुसता गिल्ला करत राहणारे आणि इतर शक्यता नष्ट करण्याचा प्रयत्न करत राहणारे त्या समाजाचे सांस्कृतिक नुकसान करत असतात. )

( आपण बरेचजण साहित्याशी संबंधित असल्याने तेही बोलून ठेवतो -- त्या ' गोची ' प्रश्नाच्या मुळापासून मानवी जगण्याचे भान घेणाऱ्या -- तो आवाका घेऊ पाहणाऱ्या -- काही साहित्यकृती असतात. त्यांना क्षुद्र लेखत, ' भूमिका घ्या -- भूमिका घ्या ' असे त्यांच्यापुढे बोंबलत राहणे सांस्कृतिक दृष्ट्या घातक असते. )

सांगा यावर विवेकी -- भौतिक उपाय ! निदान काही ' योग्य ' भूमिका तरी घेऊन दाखवा यावर ! सगळ्या भौतिक प्रश्नांच्या मुळाशी अशा भूमिकाहीन प्रश्नांची गोची असते !

खोट्या आदर्शवादाबाबत प्रश्न निर्माण करण्यासाठीच ही पोस्ट आहे. पुन्हा तीच सुभाषिते पाठ म्हणून दाखवण्यात अर्थ नाहीय ! ' विचारांची लढाई विचारांनीच लढली पाहिजे ' हे सर्वांना पाठ असले तरी तशी ती लढता येत नाही, लढली जात नाही -- हे वास्तव आहे -- सत्य आहे !

माझ्या एका एकांकिकेत एक संवाद आहे -- " विचारस्वातंत्र्य ही किती भयानक गोष्ट आहे ते तिला अजून माहीत नाहीय -- "

विचारांची विचारबाह्य लढाई लाठीने खेळण्यात समजा कुणी पारंगत आहे तर सर्वांनी फक्त लाठीच वापरली पाहिजे, असे त्याचे म्हणणे कुणी ऐकणार नाही ! समोरच्याकडे अणुबाँबही असू शकतो !

समजा, बीजेपी, काँग्रेस आणि कम्युनिस्ट असे तीन वैचारिक साचे आहेत. यांतले कोण लोक किती भ्रष्ट आहेत वगैरे विचारबाह्य मुद्दे प्रभाव गाजवतातच, पण, विचारासाठी, समजा, ते बाजूला ठेवू. तरीही, त्या तिन्ही विचारव्यूहांची तपशीलवार तौलनिक समज घेत बसणे बहुसंख्यांना शक्य नसते. शिवाय, त्या विचारांप्रमाणे गेल्यास पुढे काय काय होईल याचे सगळे अंदाज करणेही शक्य नसते. लोक उत्स्फूर्ततेवरच अवलंबून राहतात, शेवटी ! त्या उत्स्फूर्ततेला आवाहन करण्यासाठीही काही विचारबाह्य म्हणा, भावनिक म्हणा असे मार्ग हाताळावे लागतात !

या यक्षप्रश्नावर अहिंसक, वैचारिक मार्ग सुचातात का हे शोधायचे आहे --

टिंगली करायच्या सवयीमुळे अशी नसलेले गृहीत धरून बोलायची सवय लागते !

मी आंतरिक समाधानी आहे असे मी कुठेही म्हटलेले नाहीय -- नसलेले गृहीत धरायची पद्धत नको, प्लीज --

आणि ते तरी विवेकवाद या बंडल कल्पनेचा पुरस्कार कशासाठी करत असतात ? त्या मार्गाने इथे आनंदवनभुवन येईल, असे वाटते, म्हणूनच ना ? की सगळीकडे आंतरिक असमाधान पसरावे म्हणून ? आधी, टिंगलीशिवाय बोलता येणे, ही संवादाची प्राथमिक गरज आहे -- त्यांच्या बोलण्याच्या स्टाईलबद्दल वर आधीच लिहून ठेवलेलेच आहे --

आंतरिक असमाधान आणि गोंधळ असलेल्या डोक्यातून कसला दगडाचा विवेक उगवेल ?

' आंतरिक समाधान ' ही संज्ञा घ्यायची आणि टिंगलीचा सूर लावायचा तर ' विवेकवादा ' ची बकवास काय असते ? मोक्षाइतकीच अशक्य ही गोष्ट का चालते ?

जे लोक दुसऱ्यांना भंपक म्हणतात ते काय आहेत हेही सांगितले जाणारच -- आणि आता आंतरिक समाधानवाले आलेत असे मी म्हटलेले नाहीय -- जे म्हटलेलेच नाहीय ते गृहीत धरून बोलू नये, एवढी तरी शिस्त पाळली जावी --

-- त्या सगळ्या कॉमेंटस नसून मूळ पोस्टचे विशदीकरण म्हणून आलेली वाक्ये आहेत, हे मी नम्रपणे नमूद करतो --

बालपण हे कितव्या वर्षापर्यंत ? समजा १४ -- मी तर जबरदस्त सेक्सकॉन्शस होतो !

जे जे लोक मानवी प्रश्नांची हमखास उत्तरे देतात ते ते लोक सांस्कृतिक क्षेत्रात भंगार असतात -- कारण, संस्कृती ही प्रवाही असते --

मराठीने सर्वप्रथम, या भंगार संस्कृतिद्वेष्ट्यांना नाकारण्याची गरज आहे --

तुम्हाला आधीच सगळे समजलेय तर कसली झ्याटाची संस्कृती ?

संस्कृती म्हणजे जगणे समजून घेण्याची प्रक्रिया --

मला जिंकायचे नाहीच आहे -- तुम्ही जिंका -- विषय -- आपण सगळे नीट जगू या, हा आहे --

आयला ! मी इतका उचकवण्याचा प्रयत्न केलाय, पण नो प्रतिसाद ! हे साले माझे मित्र, मला उचकवतात तेव्हा मी मात्र बोलतो --

इथले अभिव्यक्तिस्वातंत्र्यासाठी आघाडीवर असणारे, आंदोलने करणारे, हेही दडपादडपीवालेच आहेत -- हे कधी पाहणार ?

कलावंत जगेल तो त्याच्या आकलनाच्या मार्गाने जगेल -- सांस्कृतिक क्षेत्रातल्या बाजारबुणग्यांच्या भीतीतून नव्हे --

किरकोळ बुद्धी आणि बऱ्यापैकी विद्वत्ता यांच्या जोरावर इथल्या सांस्कृतिक क्षेत्राची वाट लावण्यात आलेली आहे !

फ्रेंडस, खुले व्हा -- जिंकणे-हरणे असा विचार नका करू, प्लीज -- मला माझ्या मित्रांकडून हरण्यात मुळीच शरम वाटत नाही -- कारण, जिंकणे-हरणे हे बौद्धिक असते -- कुणीही हरू शकतो --

मीही मूर्खच असण्याची शक्यता आहेच, पण तुम्ही सिद्ध शहाणे मुळीच नाही आहात, एवढेच माझे म्हणणे आहे --

' मी भौतिक प्रश्नांना महत्त्व देतो ' असे उदात्त आणि कणवपूर्ण बोलत असतात हे लोक, पण, यात माणसाचे मन हा एक महत्त्वाचा घटक असतो, हे या मूर्खांना मुळीच समजत नाही --

हे इतके वेडे आहेत की जागतिकीकरण कसे वाईट आहे, यावरच अजून हाणत बसतात !

टिंगलटवाळ्या, उपरोध, कुचेष्टा आणि छद्मी हास्य हीच या विशिष्ट पुरोगाम्यांची हत्यारे आहेत, जी त्यांना न आवडणाऱ्या संघाचीही आहेत ( जरी संघवाले आता जरा सुधारलेत, असे दिसतेय ! पण हे सुधारण्याची आशाच दिसत नाहीय ! )

हे बाजारबुणगे लोक आहेत -- ' नथिंगनेस ' हा यांना एक मानसिक ' परिणाम ' वाटतो -- याचा आणि तुकारामाची ' रिकामीक ' यांचा काय संबंध आहे, हे यांनी सांगावे --

हे लोक अडथळ्यांची जी शर्यत रचतात तीत भाग घ्यायचे मान्य केले तर त्यांची विचारसरणी मान्य करणे, हेच फक्त घडू शकते ! तीत भाग घ्यायचे नाकारूनच यांना टक्कर देणे आवश्यक आहे !

आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे दिखाऊ भोक्तेच ही दडपशाही जास्त करतात !

मला कशाचेच कोणतेही उदात्तीकरण करायचे नाहीय, पण खोट्या, बोथट हुशारीने वेगळ्या आकलनाच्या लोकांना दबवणे जे चालू आहे, त्याला मी विरोध करू इच्छितो --

त्यांच्या ऐवजी हे म्हणजे चांगले, असे यात कुठेही म्हटलेले नाहीय --

आंतरिक समाधान देणारे असे कुणी नसतात !

आपल्या विचारांना मत दिले की जनता शहाणी, तसे नाही झाले की मूर्ख -- हे तर सगळेच करत असतात.

या दोन्हींत विरोध समजणे चुकीचे आहे -- सर्व मिळूनच माणसाचे जगणे असणार. भौतिक गरजा भागेपर्यंत सांस्कृतिक प्रक्रिया बंद ठेवा, असे कुणी म्हणू नये !

गरजा तरी भागतील किंवा आंतरिक समाधान तरी मिळेल -- ही बोगस, आपमतलबी मांडणी आहे .

दोन्हींतले एकच निवडावे लागते -- हा खोटा चॉईस आहे !

माणूस नुसता ' विवेका ' ने जगत नसतो, हे आता सगळ्यांना समजते. त्यामुळे, नुसता बुद्धिप्रामाण्याचा टेंभा मिरवणेही बंद व्हायला हवेय. बौद्धिकतेच्या अंगाने, त्या विचारसरणीने गेलेल्यांचीही तीच बोंब आहे. राग, लोभ, द्वेष, सुखाची हाव, वर्चस्वाची हाव -- हे सगळे भौतिकच आहे ना ? या सगळ्या गोष्टींचा प्रभाव असतो. तथाकथित बौद्धिक देशांत भ्रष्टाचार, अन्याय नाहीत, असे कोण म्हणू शकेल ? प्रचारकी बोलण्यापेक्षा जरा अधिक गंभीरपणे बोलण्याचा हा विषय आहे. नुसती बोटे दाखवून उपयोग नाहीय. आणि, मुळात, भारत हा संत-शिकवण जगणारा देश आहे का, या प्रश्नाचे उत्तरही खूप विवाद्य असेल !

या शाहिरामुळे कोण दुखावले गेले आहे किंवा दुसऱ्या कोणत्या कारणाने त्याला यात अडकवणे घडते आहे ?

अभय, तुम्ही तो सिनेमा असल्याचे विसरून सत्यावर आधारित असल्याचे समर्थन देण्यात काही अर्थ नाही --

अहो, काही डायरेक्ट लिंक असणे आणि नसणे -- हे पाहा ना -- नुसते बरोबर-चूक, न्याय-अन्याय -- असा नाहीय हा विषय --

चित्रपट मलाही आवडला -- ते मी लिहिले आहेच -- पण, जो बावळटपणा वाटतो, त्याला तेच म्हणणे भाग आहे. थोडा विचार केला असता तर हा मोठा दोष घालवता येणे शक्य होते, हे म्हणायचे आहे.

A word uttered in the fit of anger or emotion without intending the consequences to actually follow cannot be said to be instigation. -- असा एक कोर्टाचाच निर्णय आहे. उद्या कोणत्याही

कवितेमुळे वा कथेमुळे आत्महत्या झाली असे जोडले जाईल ! इथे मुळात, असे काही जोडून याला पकडावे हे पोलिसांच्या डोक्यात येणे, हे घडलेच कसे ?

कुठेतरी काही धागा, काही कारण, कुणी सांगणे-उचकवणे असणार -- तुम्ही काहीही म्हणा, सिनेमा ही एक कलाकृती आहे आणि इथे ती वास्तववादाच्या अंगाने जाते -- इथे ' आत्महत्येला प्रवृत्त करणे ' हे मला अती ताणलेल्या कल्पनाशक्तीचे आणि मुळीच न प़टणारे वाटते. त्यामुळे, या चित्रपटाचा पायाच बोंबललेला आहे, हे माझे मत आहेच.

एकात्मिक ग्रामीण विकास योजनेच्या काळात या कर्जाबाबतच्या यशोगाथा येत -- सर्व माध्यमांतून येत -- त्या यशोगाथांची टक्केवारी कधी कुणी विचारत नसे -- ' सारखा संशय नको -- चला महासत्ता होण्याच्या दिशेने ! ' हे कायमचे ब्रीदवाक्य आहे ! अपयश आवडणारा वा सहन करणारा राज्यकर्ता ही एक फँटसीच म्हणावी लागेल !

आणीबाणीच्या काळातल्या कुटुंबनियोजन शस्त्रक्रियांबाबत एन डी पाटील म्हणत -- सगळीकडून आकडे आलेत -- त्यांची बेरीजही करून झालीय -- मग, तुम्ही म्हणाल, टोटल झाल्या किती शस्त्रक्रिया ? जाहीर का नाही करत ? -- तर, त्यात एक अडचण आलीय -- ती एकूण बेरीज भारताच्या एकूण लोकसंख्येपेक्षा जरा जास्त येतेय ! -- त्यांची अतिशयोक्ती सोडली तरी, सरकारी स्तरावर यश ' दाखवणे ' हे वर्षानुवर्षे असत आलेले आहे. अमुक पक्षाचे राज्य आले म्हणजे सगळे बिनचूक चालेल, यावर विश्वास बसणे अवघड आहे.

धन्यवाद फ्रेंडस ! मधेच माझी इथली उपस्थिती कमी होणे वा काही दिवस बंदच होणे, असे शक्य असल्याने फ्रेंडसना याबाबत माहिती देऊन ठेवावी म्हणून ही पोस्ट दिली. आपणा सर्वांची आपुलकी आणि सदिच्छा यांची मला नेहमीच जाणीव असते !

वैचारिक आकलन म्हणजे संस्कारबद्ध आकलन –

काही बुद्धिवादी लोक म्हणतात की तुम्ही काहीही करा वा नका करू, तुम्ही भूमिका घ्या वा नका घेऊ ( भूमिका न घेणे हीही एक भूमिकाच ! ) -- तसेच इथे होऊ शकते -- तुमचा प्रयत्न असो नसो -- तो पोलिटिकल करेक्ट राहण्याचाच प्रयत्न आहे, असे होण्याचा धोका राहणारच !

वास्तवातले ' पटणे ' आणि फँटसीतले ' पटणे ' वेगळे पण दोन्ही आवश्यक.

कौशलचे बरोबर आहे. काफ्काच्या ' ट्रायल ' मध्ये होणारी अटक ही फँटसीतली आहे -- ती अध्यात्मिक प्रश्नांनी घेतलेला कब्जा -- अशीही असू शकते -- तिथे आपण ते स्वीकारू शकतो. ' कोर्ट ' मध्ये तसे होऊ शकत नाही कारण ते सगळे वास्तव कार्यकारणातले आहे. तिथे प्रिमाईस नीट लागणारच.

फार हिरीरीने बोलणारा दुसऱ्याला स्वातंत्र्य ठेवतच नाही -- अशाशी बोलण्यात वा त्याला उत्तर देण्यात अर्थच नसतो --

' कोर्ट ' व्यावसयिक नाहीय, तरीही, पाया कच्चा आहे !

तिसराही एक पर्याय आहे ना -- बाजार वा परंपरा यांना भीक न घालता आपल्या आकलनाप्रमाणे काम करणे. पण, मग, अशा वेळी, त्या व्यक्तीनेही आपली दखल घेण्याची भीक मागू नये !

कलाकृती ही वस्तूरूपही असल्यामुळे वस्तुगततेचे नियमही तिला पाळावे लागतात -- ती त्याच नियमांतली ऍब्सर्डिटि दाखवणारी असली तरीही --

मी माझ्या पोस्टमध्ये ' खोटा भक्कम ' पाया जो म्हटला तो खोटेपणाने घडवलेला पण व्यवहारात जो सत्य धरून चालला गेला तो -- या अर्थी --

एक जुनी गोष्ट आहे. " कोणते पाहिलेस नाटक ? " मला शेजाऱ्यांनी विचारले. म्हटले, " नाटककाराच्या शोधात सहा पात्रे ! " आणि मी भरभरून बोललो. असे नाटक आणि असा प्रयोग ! मराठीतले हे ग्रेट घडलेय ! तर माझे ऐकून आख्खी फॅमिली गेली ते पाहायला ! मला भरपूर शिव्याशाप बसले ! त्यांतला एकजण म्हणाला, " मी सारखा बाहेर जाऊन सिगरेट ओढत होतो -- आख्खे पाकीट संपले ! तिकिटांचे आणि सिगरेटचे पैसे वाया गेले ! " तेव्हापासून मी खूप उत्साहाने कुणाला काही सांगत नाही. " मला खूप आवडले -- आणखी कुणाला आवडेल का याची मी हमी घेत नाही ! " असे सांगतो ! धंदेवाले म्हणतील, पिरांदेल्लोने प्रेक्षकांना कमी लेखू नये. तोच लेखनात कमी पडला असणार !

तुम्ही म्हणताय तर पाहणारच --

तक्रार चालणार नाही -- तूच तुझ्या जेवणाचा शिल्पकार !

आजच्या पुणे सकाळमध्ये सलील वाघ यांचा विलास सारंगांवर एक चांगला लेख आलेला आहे -- त्याची लिंक -- Saleel Wagh --

http://epaper.esakal.com/sakal/16Apr2015/Normal/PuneCity/page7.htm

मी फारच चुकून कधीतरी अगदी थोडा वेळ, जी चालू असेल समोर ती सीरीयल -- पाहतो -- आणि तरीही मला त्यात असे काही मौल्यवान मिळून जाते ! मी नशीबवान आहे की एकूणात सीरीयल्स असतातच मौल्यवान ?

शर्यतीत भाग घेणाऱ्या सर्वांना झी च्या आईआजींकडून ऑरेंज गोळ्या !

अचूक आणि स्फोटक विनोद !

विलास सारंग : द्वैभाषिक लेखक - काही मुद्दे :अक्षरांचा श्रम केला
---मी काहीसा संशयास्पद 'मराठी' लेखक आहे .

माझ्या स्वभावाची गंमत सांगतो -- आग्र्याला गेलो तरी मी ताजमहाल पाहीनच याची खात्री नाही --

वाचकही जर तितकाच सर्जक लागत असेल तर कलाकृतीचे कामच काय -- असा आहे प्रश्न --

झूल नुसती लेखकपणाची नसते -- मी अमुक विचारसरणीचा आहे, मी गरीबीत वाढलेलो आहे, मी पैशांची फिकीर केली नाही, मी अन्यायाला विरोध करणारा आहे, नीतीबाबत माझी अशी मते आहेत, वगैरे -- या सगळ्या झुलीच असतात !

कलेत भावनिकता वा वैचारिकता पूर्णपणे एकमेकींना वगळून असू शकत नाहीत -- हा एक कल असतो. दोन्ही दिशांच्या चांगल्या कलाकृती या दोन्हींच्या मर्यादांचे भान देतात, असे मला दिसते.

Romanticism - a movement in literature and art during the late 18th and early 19th centuries that celebrated nature rather than civilization; "Romanticism valued imagination and emotion over rationality"

प्रत्येकाची जनुकरचना, जन्मल्यापासूनची परिस्थिती, असंख्य परिणाम -- हे सगळे वेगळे वेगळे असते -- उगीचच त्याच्यापुढे असंबद्ध आदर्श ठेवून त्याला न्यूनगंड तर दिला जातोच, शिवाय, मानसिक तुलनेत आणि ' तिथे ' पोचायचेय या कल्पनेत त्याची शक्ती वाया जात राहते. त्याच्या कुवती फुलणे, सर्व शक्ती वापरल्या जाणे याला तो अडथळा होतो. यशाची, मोठेपणाची चाकोरी बिंबवत राहण्यापेक्षा त्या मुलाला त्याच्या सर्वस्वाने वाढू देणे हेच महत्त्वाचे.

भेजा ठीक पण कलेजा नको --

पाहणे, वाचणे, अनुभवणे -- हे सगळे चालू दे पण ' तुला असे व्हायचे आहे ' हे पूर्ण वगळले पाहिजे.

' आदर्श ' मुळीच नकोत --

मुलांना चरित्रे आणि कुणाच्याही यशोगाथा वाचायला लावून ते आदर्श आहेत असे त्यांना मानायला लावणे ही शिक्षणाची घाणेरडी पद्धत आहे.

अमिताभ, ओबामा, नारळीकर -- हे सगळे माझे भ्रम असू शकतात -- माझे जगणे हे कमी वा जास्त महत्त्वाचे का असावे ?

ज्ञानेश्वर, तुकाराम, सार्त्र अशी माणसे, आपण स्वतः समजून घ्यायला आपल्याला उद्युक्त करतात, हे महत्त्वाचे आहे.

मानेवर आणि दोन भुवयांच्या मधल्या बिंदूवर बोटांनी थोडा दाब द्या -- २-३ मिनिटे -- नंतर कोमट पाणी पिऊन झोपा. झोप लागलीच पाहिजे हा अट्टहास सोडा -- नुसते पडून राहा.

कविता ठरवून ' आनंदी ' करणेही फार दुःखदायक होईल !

वॉशिंग्टनला नुसते वाशी म्हणावे.

याचे प्रमाण सर्वांत जास्त असलेले जे जगातले विभाग आहेत, त्यांत भारत आहे हे WHO च्या नकाशातल्या लाल भडक रंगावरून स्पष्ट आहे. त्यामुळे, आकडेवारीचा वाद फार अर्थपूर्ण वाटत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे त्या त्या क्षेत्रातली नामवंत माणसे आपापले काम नीट करत असणार असेच समजून त्याकडे पाहिले जाते. बरखा दत्तला खोटी माहिती खपवून काही

फायदा झाला असेल अशा शंकेला कारण दिसत नाही. मुख्य म्हणजे त्या मांडणीत नुसते तथ्यच नव्हे तर प्रखर सत्य आहे, हे स्पष्ट दिसतेय. असो. मी पोस्ट देतो तेव्हा, त्याच्या अनेक बाजू आणि त्याचा मथितार्थ फ्रेंडसच्या लक्षात यावा, हाच उद्देश असतो. तो उद्देश इथे सफल झाला, असे मला वाटते. सर्व सहभागी फ्रेंडसचे आभार !

नुसत्या क्रोसीनवर नका राहू -- नीट सल्ला मिळवाच --

' कोंडुरा ' याच नावाची त्यांची कादंबरीही आहेच ना --

You commented on your post.
Now we have the highest suicides rates in the world in the 15-29 age group , in one study 10 times more than America. -- बरखा दत्तने दीपिका पदुकोणची मुलाखत घेतली, त्या मुलाखतीत आलेले हे वाक्य आहे.

नेटवर प्रतिलाख प्रमाण अमेरिका १.९ आणि भारत १०.५ असे सापडते.

काल तर -- साहित्य, संमेलने हे सगळेच कंटाळवाणे होत चालले आहे, असे म्हणणाऱ्यांनी, त्यावर मस्त, कंटाळवाणी चर्चा केली ! –

बँकेत या कम्युनिस्ट युनियनचा सभासद -- बाहेर गेला की आर एस एस चा पुरस्कर्ता -- हे सहज होते ! त्या वेळच्या तत्त्वधार्जिण्यांना ते अवघड होते पण आताच्या आपद्धर्मवाल्यांना त्याचे काहीच वाटणार नाही !

वर लिहिलेले सगळे इथल्या संदर्भात पाहून बोलावे, ही नम्र विनंती. किंवा मग सगळ्याच गोष्टींची परदेशांतल्या सुविधांशी तुलना करून बोलावे.

मला कोणती आठवण झाली ते सांगतो -- मुंबई विद्यापीठाने एक नाट्योत्सव आणि नाट्यचर्चासत्र आयोजित केलेले होते. त्यासाठी, माझा नाटककार मित्र दिलीप जगताप आणि मी, आम्हाला निमंत्रण होते. विद्यापीठाच्या आवारात गेल्यावर, राहण्याची व्यवस्था नेमकी कुठे आहे, हे शोधून काढणे हे एक मोठे काम झाले. भर दुपारची उन्हाची वेळ. एका हॉस्टेलमधल्या ( अर्थातच लिफ्ट नसणाऱ्या ) तिसऱ्या मजल्यावरच्या एका खोलीत आमची ' व्यवस्था ' हो ती ! तिथे आम्ही दोघे आणि आणखी एक ( जो खाली झोपणार होता ) अशी तिघांची ' सोय ' होती. ही एक खोली आणि तिला लागून

पलिकडे असलेली एक खोली यांच्यांत समाईक संडास-बाथरूम होते. कुणीतरी वापरून टाकलेल्या गाद्या-उशा पडलेल्या होत्या. चादरीही, घड्याही न करता टाकलेल्या पडून होत्या. प्यायच्या पाण्याची व्यवस्था दुसऱ्या दिवसापासून होईल, असे सांगण्यात आले. जेवणाची कुपन्स दिलेले कँटीन शोधणे खूप अवघड गेले. कसेबसे जेवून उन्हातून त्या खोलीवर परतलो. या उत्सवाला आणि या चर्चासत्राला लाथा घालून ताबडतोब तिथून सुटायचा आम्ही निर्णय घेतला. आम्ही असे निघून आल्याची कुणी दखलही घेतली नाही. आम्ही क्षुद्र आणि फडतूसच होतो, हे असे मौल्यवान शिक्षण आपल्या महान विद्यापीठाने आम्हाला दिले ! आतापर्यंत हे आम्ही कुठेही बोललो नव्हतो.

आता यातूनही विरक्त नका होऊ, नाही तर, ' मी कोण ' हा अध्यात्मिक प्रश्न विचारायची वेळ येईल !

गहिवरून येण्याची वेळ कधीही येणार नाही -- निश्चिंत राहा !

' संस्कृती ' म्हणजे शांतता, समता, सौहार्द आणि सर्जकता. ती तुकड्यातुकड्यांच्या ' भूमिकां ' मधून निर्माण होऊ शकणार नाही, हे स्पष्ट आहे.

' आस्वाद ' ही संज्ञा मनाला खुश करण्याचा अर्थ सांगते. सर्जक साहित्य वा कला या अशा खुश करण्यासाठी नसतात. त्या मनाच्या मर्यादांची जाणीव करून देतात. बरोबर-चूक, नैतिक-अनैतिक, न्याय-अन्याय अशा शिक्क्यांशिवाय त्या जगण्याचे भान देतात.

निष्कर्षांचे साचे स्वीकारून होणारे ललित लेखन वा साचेबद्ध वैचारिक अपेक्षा बाळगून केलेली समीक्षा, या दोन्ही गोष्टी परिपक्वतेच्या दिशेने जाऊ शकत नाहीत. कारण परिपक्वता ही एकच असते -- याची वेगळी, त्याची वेगळी -- अशी नसते.

You commented on Ina de Graaf's post.
Truth cannot be a part of mind -- mind is painful.

' बला ' म्हणजे संकट, लचांड वा त्रास -- अशी नसलेली स्त्री -- म्हणजे अबला !

यस ! ग्रेट ! जगातल्या सर्वांत न्यायी असलेल्या समाजवाद्यांत मतभेद असावेत, तसेच हे !

' ठरवून चिकित्सा ' आणि ' खुली चिकित्सा ' -- असा काही फरक असू शकतो का ? उपरोध ठीक असणारच पण चांगली समीक्षा मला तरी महत्त्वाचीच वाटते.

नुसते लिहून ठेवतोय काही -- गरज पडल्यास या सूचना लौकर सापडण्यासाठी --

मान्य ! ' लमाण ' तर नावापासूनच फसलेले आहे.

एकीकडे मित्र म्हणून माझ्याबद्दल प्रेम वाटावे, माझे म्हणणे पटावे आणि त्याच वेळी आपद्धर्म म्हणून ई-संमेलनवाल्यांची बाजू घ्यायचेही मनात असावे -- अशी फाटकी ' भूमिका ' एखाद्याच्या मनात येणे -- हेही या पोस्टचे कार्य आहे !

मी, माझी वा माझ्या लेखनाची कोणतीही स्तुती करू इच्छित नाही -- पण माझ्या वेबसाईटला टाळून मराठी ई-साहित्य -- असे का होत असावे -- यावर संबंधितांच्या मनांत प्रश्न यावा, असे मात्र वाटते -- ही वेबसाईट फालतू लेखनाने भरलेली आहे, असे म्हटले तरी कसला प्रश्न येईल ?

फ्रेंडस, मला मदत नको आहे -- न्यायही मागायचा नाहीय -- पण, मराठीत हे काय चाललेले आहे ते समोर नक्कीच आणायचे आहे --

-- खंत करावी लागू नये यासाठीचे उपलब्ध मार्ग मला ठाऊक नसतील, असे कृपया समजू नये.

-- म्हणजे असे झाले हे -- माझी अशी वेबसाईट असल्यामुळे ई-संमेलनाच्या दृष्टीने मी नगण्य झालो !

-- अहो, खंतबिंत नव्हे -- अशा अजून अनेक गोष्टी आहेत ! माझे काम नीट चालू आहे, तो प्रश्न नाही ! पण, तुमचा प्रेमळ जिव्हाळा मान्य !

राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या अहवालाने महाराष्ट्राची उरलीसुरली अब्रू चव्हाट्यावर टांगली आहे. राज्यात अवघ्या एका वर्षात ' ऑनर किलिंग ' च्या म्हणजे तथाकथित प्रतिष्ठा जपण्यापायी खून झाल्याच्या तब्बल २२० घटना घडल्याचे हा अहवाल सांगतो. -- पाहा आजच्या मटातला अग्रलेख.

कशी वाचावी ज्ञानेश्वरी ...

जैसे शारदीचिये चंद्रकळें । माजि अमृतकण कोवळें ।

ते वेंचिती मने मवाळें । चकोरतलगे ॥ ५६:१ ॥

...

आत्मीयतेचे छान विवेचन !

'द्विभार्या नतमस्तक कायदा !'

एक रेग्युलर, एक लिव्ह इन -- त्यांच्याकडे लिव्ह इनेचीही तीच असतात कर्मकांडे !

दिल्लीच्या ' सितारा ' हॉटेलात सगळेच याच्या दसपट चांगले मिळते -- असे सांगून टाकायचे मग !

आवड-नावड, सोपेपणा-अवघडपणा, अभ्यासविषय असणे-नसणे, टाईमपासला योग्य-अयोग्य असणे -- अशा अनेक कारणांनी फरक पडू शकतात. माझ्या पोस्टवर ज्यांच्या कॉमेंटस असतात त्या सर्वांना मी लाईक देतो, याचा अर्थ मी सहमत असतो असे नाही तर मी वाचलेय / दखल घेतलीय / सहभागाबद्दल आभारी आहे -- असा असतो.

-- अहो, अनुषंगाने येते आहे सगळेच -- शाहीर साबळे, खानोलकर आणि सुहास भालेकर या तिघांच्याही जीवनातल्या या महत्त्वाच्या गोष्टी आहेत -- सांगा तुम्ही --

एक आनुषंगिक आठवण -- खानोलकर एका बैठ्या, ओळीने घरे असलेल्या इमारतीत राहात असत. त्यांचा शेजारी त्यांचा शत्रूच म्हणावा, असा होता. अत्र्यांनी जेव्हा ' अजगर ' वर अग्रलेख लिहून खानोलकरांना झोडपून काढले तेव्हा तो खुश झाला होता. अत्र्यांनीच हा इतका वाईट आहे म्हटल्यावर आता याचे राहिलेच काय, असे त्याला वाटत होते. खानोलकरांना जे अनेक अडथळे ओलांडून लिहावे लागे त्यांतला एक अडथळा हा शेजारी होता. जास्तीत जास्त वेळ दणादण तबल्याचा रियाझ चालू ठेवणे हे तो प्राणपणाने करत असे !

डॉक्टर, प्रत्यक्ष जगण्यात तुम्ही मोठमोठी आव्हाने घेत असता, हे आम्हा सर्वांना माहीत आहे -- माणसे जगवण्याचे काम हे नक्कीच एक श्रेष्ठ काम आहे ! त्या प्रक्रियेत होणारी तुमची चिंतने इथे येत असतात. त्या त्या वेळी अनेकांच्या आयुष्यांत या चिंतनांनी नक्कीच काही जीवनसन्मुख काम केलेच असणार. त्यामुळे, तुमच्या इथल्या कामाला कुणीही बालवाडी म्हणणार नाही. ते नक्कीच एक उत्साहवर्धक, शक्तिदायक रसायन आहे ! आम्ही ते आवडीने वाचतो !

' उपयोगा ' पेक्षा महत्त्वाचे काही असू शकते का, असा नुसता प्रश्न विचारायलाही मनाचा नकार असतो ! --

उत्सवांसाठी रस्त्यांत मंडप टाकून लोकांची गैरसोय करण्याबाबत कोर्टाने काही निर्णय दिलेला आहे -- तो आहे मुख्य विषय --

ते बाकीचे धागेदोरे, संदर्भ आणि मुद्दे खूप निघतील -- आधी मोठा पापी पाहा, मगच लहान पाप्याची दखल घ्या -- हा आहे विषय. महिनादीड महिना तर ट्रॅफिक जॅम होतोय -- घ्या तेवढे चालवून -- हा मुद्दा आहे --

सर्व प्रक्रियेतून जगणे म्हणजे बदलती मनःस्थिती -- ती हालचाल थांबली की जगणे संपते !

लंबर-सपोर्ट असलेली काँप्यूटर चेयर घ्या -- मी तीच घेतलेली आहे --

निसर्गात नाश होत असतो -- हे नैराश्य ?

-- अरे, तुम्ही तर व्यंगचित्रकार आहात , तुम्हालाही हे गंमत म्हणून पाहता येऊ नये ? वास्तवाचे संदर्भ काढले तर गंमत जाते हो !

-- मित्रांना सांगावेसे वाटते ते मी सांगतो -- तुम्ही मुळीच हसू नका -- ते तुमचे स्वातंत्र्य आहे --

समजा एखाद्या कलाकृतीचा तसा हेतू नसतानाही एखाद्या समूहाच्या भावना दुखावल्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, तर काय -- असा प्रश्न माझ्या मनात आला.

यात शंकाकुशंका, मते यांच्या चर्चेला वाव आहे, म्हणून तर दिलीय ही पोस्ट --

मिळमिळीत होऊ नये याच्या बदल्यात अन्याय, विषमता, छळ, युद्धे -- हेही अटळपणे स्वीकारावे लागल्याने सगळे असुरक्षित होते !

' मुगुट ' नव्हे --' मुकुट ' -- हे सर्वांनी लक्षात ठेवावे --

चीनमध्ये मुलगे आणि मुली यांना समान वारसा हक्क आहेत -- आणि मुले म्हणजे -- The "children" referred to in this Law include legitimate children, illegitimate children and adopted children, as well as step-children who supported or were supported by the decedent.
लग्नानंतर मुलगी नाव बदलत नाही. मुले बापाचे वा आईचे नाव लावू शकतात. -----
हे असे असूनही त्यांना मुलगेच का हवे असतात, हे नीट कळत नाहीय -- जाणकारांनी कृपया यावर प्रकाश टाकावा --

म्हणजे, पूर्ण, नॉर्मल मर्दांमध्ये X आणि Y दोन्ही क्रोमोसोम्स असतात -- समजा एखाद्याचे असे म्हणणे असेल की तो फक्त Y घेऊनच फिरत असतो -- तर त्याला काय म्हणावे लागेल, ते बघा !

You commented on your post.
Will the baby be a Girl or Boy ?
At conception, gender is determined by chromosome characteristics - and it will be the male (or rather the male's sperm) that dictates whether the baby will be a boy or a girl.
Prior to conception, the unfertilized egg carries an X chromosome while the sperm can carry either an X or aY chromosome. The gender of the baby comes down to one simple event:
If the sperm carrying an X chromosome fertilizes the egg, a girl will be conceived.
If the sperm carrying a Y chromosome fertilizes the egg, a boy will be conceived.

आजच्याच पुणे लोकसत्ताच्या पुणे वृत्तांतमधे पहिल्याच पानावर ' गर्भलिंगनिदानविरोधी कक्षासाठीचा ४० लाखांचा निधी जागेभावी पाण्यात ' -- ही खुद्द पुण्यासंबंधीची बातमीही आहे ! हा कक्ष कार्यरत करण्यासाठी साधी १० बाय १० ची खोलीही उपलब्ध होऊ शकलेली नाही -- दोन वर्षांत !

जे काही आहे त्याचा शारीरिक -- शब्दावकाश किती आहे किंवा त्या पानांचे किलोत वजन किती आहे -- यावर त्याचे मूल्यमापन होऊ नये, एवढी एकच सध्या सदिच्छा !

अशा वेळी ते सगळे बॉल्स आऊटसाईड द ऑफ स्टंप म्हणून सोडून द्यायचे !

आरोग्यपूर्ण स्वभाव म्हणजे contradiction in terms !

You commented on your post.
सगळेच लोक जर आपापल्या सोयी-सवयींप्रमाणे निरनिराळ्या क्षेत्रांत अवैज्ञानिक दृष्टिकोणाने वागणार असतील आणि त्याचा हिंसक पुरस्कार करणार असतील तर कुणी कुणाला शिकवावा वैज्ञानिक दृष्टिकोण ?

You commented on your post.
' वैज्ञानिक दृष्टिकोण ' असे म्हटले जाते तेव्हा तो विज्ञानाव्यतिरिक्त इतर क्षेत्रांतही असावा, अशी अपेक्षा असते ! त्यामुळे ही पोस्ट --

परदेशी नावांच्या ब्यूटिफुल तरुणी आपल्यावर फिदा होऊन बोलू लागल्या की ताबडतोब ते बंद करावे, हे बरे -- शक्य तो देशप्रेमी राहावे --

' घर अमुचे आकाश ' अशी विंदांची एक ओळ आहे -- दोन अर्थ संभवतात -- आकाश हेच आमचे घर किंवा घर हेच आमचे आकाश !

वैज्ञानिक दृष्टिकोणाचा पुरस्कार करणारे मानसशास्त्राला विज्ञान मानतात की नाही ?

कुणाशीही प्रतारणा न करणारी व्यक्ती -- नात्यात एकनिष्ठ -- ' माझ्या ' नैतिक कल्पनांमध्ये बसणारी, हा अर्थ -- तथाकथित पुरोगामी म्हणवल्या जाणाऱ्यांच्याही नैतिक कल्पना पवित्रतेची अपेक्षा करणाऱ्याच असतात -- हा गधडेपणाही पाहावा --

मुंबईतल्या किंग्स सर्कलला ' राजाचं वाटोळं ' !

ज्यांना विनोद ' दिसतात ', जमतात आणि ज्यांच्या विनोदामुळे अनेकांना हसू येऊ शकते, अशांबद्दल ही पोस्ट नाहीय. त्यासाठीच्या धडपडीतल्या केविलवाणेपणाबाबत आहे.

मी जो जसा आहे, ती माझी मला असणारी ओळख आहे -- ती बदलायला मी तयार होईन ? -- असा प्रश्न आहे !

मुले हे मुले-मुली याच अर्थाने घ्यावे.

गुणी वास्तव !

थोडक्यात म्हणजे कधी कधी वा नेहमीच आपद्धर्म मानणारे ते प्रॅग्मॅटिक !

यू ट्यूबवर या साईराम आय्यरची बरीच गाणी आहेत ! त्यांतली काही आज ऐकली !

You commented on Annant Savanur's link.

मग, तीच माझी लस्सी !

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लोहारा, ता पाचोरा, जि जळगाव.

अरे बाप रे ! त्यांची आणि माझी प्रकाश बुद्धिसागरने ओळख करून दिली होती. त्यानंतर इथेच फेसबुकवर भेट झाली ! आम्हा दोघांनाही आनंद झाला होता ! माझ्या या छान मित्राच्या स्मृतीस अभिवादन !

शोभादर्शक ! जरा हलले की डिझाईन बदलते ! कसेही सुंदरच ! ही एक शब्द आणि अर्थ यांची क्रीडा आहे ! भाषेत या सगळ्याचे स्वागत असावे --

-- मी एक साधा बीए आहे. थोडा मेरिटवाला समजला जायचो काही काळ. मी स्कॉलर असेन असा काहींचा गैरसमज होतो, हे खरे आहे, पण मी स्वतः सत्य जाणून असल्याने प्रॉब्लेम होत नाही. साध्या कारकुनीतून सुरुवात झालेली नोकरी केली. जो है वह यही है ! दुर्वांची जुडी मी पाहिलेले नाही -- पण माझी अगदी तितकी वाईट अवस्था असेल असे वाटत नाही.

माझी त्या शाखेलाच नेमणूक झालेली होती.

मी क्लार्क असताना -- " घरातले मोठे कुणी नाही का पैसे काढायला ? " असे म्हणत उभे होत पलिकडे पाहिले -- एकूण वाढ पाहून गपचुप स्लिप पोस्ट केली !

मोदी सुटामुळे गाजले -- राहुल सुटीमुळे गाजताहेत -- या भाषिक योगायोगावरची ही पोस्ट आहे --

सगळे लेखक माणूस म्हणून छान असावेत !

' बुद्धिबळ आणि झब्बू ' वरही पुन्हा काम सुरू आहे -- तेही कदाचित पुन्हा रंगमंचावर येईल --

-- त्याची जुळवाजुळव चालू आहे -- ते आकाराला येऊ लागले की सांगेनच --

रामचंद्र वामन कदम.

-- नव्वदोत्तरी नाटके -- हे एक सदर आहे -- त्यात वेगवेगळ्या नाटकांवर वेगवेगळ्या लेखकांचे लेख असतात --

' विचारस्वातंत्र्य ' ही संकल्पना मानवी संबंधांतलीच आहे. पतिपत्नी, मित्र, अनेक समूह, धर्म, आदर्श -- हे सगळे त्यात आहे. त्यातून आपले रेटणे आणि दुसऱ्याचे पाडणे येते -- या सगळ्याकडे इथे लक्ष वेधायचे आहे. वरकरणी विचारस्वातंत्र्याचे भोक्ते असणारेही अशा हिंसक घटनांच्या मागे असू शकतात. कुणाचे हितसंबंध दुखावले गेले असतील, त्यावर ते असणार.

" माझे न बिघडवता चालू द्या तुमचे विचारस्वातंत्र्य ! " -- अशी कंडिशन असते !

' In Due Course ' या नावाने मी इंग्रजीत याच मानवी स्थितिवर कविता लिहिल्या होत्या -- ते एन आय बी एन ने प्रकाशित करावे, असे तिथल्या एका प्राध्यापकांचे मत होते -- ते नाही झाले --

शंभर टक्के सगळे वाईटच असते, असे म्हटलेले नाही --वाईटही असते पण ते सुप्त असते -- असे म्हटले आहे.

अनेकजण म्हणताहेत की हे सगळे लेखन आणखी अधिक वाचकांपर्यंत पोचावे -- ते आहेच डोक्यात -- यथावकाश ते पाहू -- सध्या तुम्ही माझे इथे हक्काचे फ्रेंडस आहात -- तुम्हाला तरी सांगत जातो --

कृतीचे तपशील मनाच्या मर्यादेतले -- त्यावर थोडेच खरे-खोटे ठरते ?

आणि याच्या उलट -- प्रतिगाम्यांनो, धर्मवाद्यांनो -- तुम्ही जर का पुरोगाम्यांच्या पट्ट्यात आलात तर तुमचीही वाट लागू शकते --

तुम्ही लेख-पुस्तके लिहा, भाषणे करा, पुरोगामी राहा -- नो प्रॉब्लेम ! जग तसे करायचा प्रयत्न नका करू !

एक जुना ज्योक --
घरमालक -- ( चोरी करून पळणाऱ्या चोराला -- ) कुत्ते, कमीने --
चोर -- हो, कमीच नेतोय --

'ही खिडकी अशी का बांधली असेल ?'
जरा हटके !

-- इथे आपण फक्त आपले म्हणणे मांडायचा अधिकार घेऊ शकतो -- दुसऱ्यांना दडपायचा नाही --

गंमत, चातुर्य यांकडे सगळ्यांचे लक्ष जातेय पण -- " हे सदर शाखाप्रबंधक मराठीतले एक लेखक असल्याचेही म्हटले गेले, पण त्याला अद्याप कोणताही दुजोरा मिळालेला नाही " -- हे किती ट्रॅजिक आहे ! याची कुणीच दखल घेऊ नये ?

एकदा तर -- एकाने आणलेली गच्च भरलेली बॉक्सफाईल -- तिला हातही न लावता -- तीत काय काय आहे, त्यातले प्रॉब्लेम्स काय काय आहेत -- हे सांगून मी असेच संबंधितांना चाट पाडले होते !

त्या संघर्षाचे बरेच तपशील आणि पदर असतात -- ढोबळपणे मते देत बसण्यात अर्थच नाही, असे माझे आकलन होते -- दुसऱ्या एखाद्याने कुणाचे बरोबर ते सांगितलेही असते --

गट पडतात ते इंटरेस्टच्या क्लॅशेसमुळे -- त्यांच्या गटबाजीत माझे कोणतेच इंटरेस्ट असण्याचा प्रश्न नव्हता -- अमुक बरोबर आणि तमुक चूक असा ढोबळपणा करण्यासारखे नव्हतेच ते संघर्ष --

बहुसंख्य लोकांना जगण्याचा आधार म्हणून विभूतिपूजा आणि निरनिराळ्या अस्मिता यांची गरज वाटतेय तोवर असे टकराव होतच राहणार --

प्रत्येक मन वेगळेच असणार -- भावना दुखावल्या जाणारच -- तरीही, आपण स्वातंत्र्याच्या कल्पना कोणत्या आधारावर करतो, हाच खरा प्रश्न आहे !

अमिताभ तर असा आख्खा खंबा संपवू शकतो !

हिंदी सिनेमा, राजकारण, पक्ष, प्रेम, श्लेष आणि या सर्व खिचडीतून होणारी एक साधी गेंमत -- हे फक्त एक जातिवंत कवीच करू शकतो !

ताण, प्रक्षुब्धपणा कमी असणे म्हणजे साधेपणा --

नेटवर त्यांची बरीच पुस्तके मोफत डाऊनलोड उपलब्ध आहेत.

आता एक शेवटचा मुद्दा --
चांगल्या सर्जक लेखनाप्रमाणेच चांगल्या समीक्षेलाही तरल, संवेदनशील मन लागते. अहंकाराची आतषबाजी आणि मस्तवालपणाची तलवारबाजी करत चांगली समीक्षा लिहिली जाऊ शकत नाही. ज्याला सर्जक लेखन जमत नाही तो समीक्षक होतो, असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. चांगली समीक्षा ही सर्जक समीक्षाच असते. अशी मला आत्ता आठवणारी दोन उदाहरणे म्हणजे माधव आचवलांचे ' जास्वंद ' हे पुस्तक आणी मार्टिन एस्लिनचे ' The theater of the Absurd ' -- हे पुस्तक.

--मेलडी खाओ और खुद जान जाओ !

-- नेमाड्यांच्या समीक्षेचे यथार्थ वर्णन आपण केले आहे -- नुसती निंदा नाही -- चेष्टा, कुचेष्टा आहे -- टवाळी आहे --

आपल्या स्वभावातून जगण्याला येणारी प्रतिक्रिया असे मर्यादित स्वरूप असलेल्या साहित्याला मौल्यवान म्हणता येईल का -- हा एक सार-प्रश्न यातून समोर येतो. इथे खरे तर तो प्रश्न असा विचारला पाहिजे की नेमाड्यांच्या स्वभावातून त्यांच्या जगण्याला त्यांची जी प्रतिक्रिया येते, तीच सर्वांनी साहित्यिक मूल्य म्हणून स्वीकारायला हवी का ? मग तोच न्याय सर्वच लेखकांना कसा लावता येईल ?

ज्ञानेश्वर, तुकाराम, पिरांदेल्लो, एलियट, बेकेट, आयनेस्को -- हे स्वतःच्या स्वभावाचे स्तोम माजवण्यासाठी लिहीत होते ?

रोमँटिक नको, वास्तववाद हवा, अराजकता नको, सामाजिक जाणिवा हव्या, लैंगिकता नको -- असे त्यांनी सांगितलेले हवे-नको ओळीने सगळे एकत्र केले तर ती त्यांची स्वतःची स्वभावविवैशिष्ट्येच असल्याचे दिसते. तीच वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनात आहेत. मग प्रश्न असा येतो की एखाद्याचा स्वभाव हे साहित्यिक मूल्य असते का ? आजच्या अनेक तरुण लेखकांना अराजकता, मूल्यहीनता, एकाकीपणा -- हे जाणवते आहे -- मग त्यांचे कसे करणार मूल्यमापन ?

आणि नेमाड्यांनी शेकडो लेखकांना त्यांच्या समीक्षेतून निकालात काढले ते काय होते ? नोबेल विजेत्यांनाही त्यांनी फालतू म्हटले !

पण एकच देशीवाद, एकच नैतिकता, एकच वास्तववाद -- यांचा पुकारा करणाऱ्याचा आवाज फार मोठा व्हायला लागला तर हे बोलणेही आवश्यक असते.

एका लोकनाट्यात, नशिबाने एक धोबी राजा होतो ! त्याला राजाचा अंगरखा दिला जातो -- तो पाहून धोबी म्हणतो, " याला इस्त्री केलीय का ? की घडी करून ठेवलावता उशीखाली ? " -- माणूस राजा होवो की मोठा विद्वान होवो, मूळ संकुचितपणा लपत नाही, हेच खरे ! विद्वत्तेचा, अडाणचोट बोलण्याचा दबाव तर येतोच लोकांवर पण एकूण संकुचितपणा उघडा पडत गेला की त्या ' मौल्यवान ' मतांची रयाच जाते !

गटांनुरूप वा व्यक्तींनुरूप नैतिकताही वेगवेगळी असेल तर मौल्यवान नैतिकता कोणती ? हे ठरवण्यासाठी कोणते निकष वापरावेत ?

एकदा विच्छेदनाची / विभक्तीकरणाची पद्धत वापरायची ठरली तर इथले निरनिराळे जाती-धर्म-वर्ग-भाषा-प्रांत-लिंग या सर्वांचा देशीवाद एकच असेल ?

हे मुख्यतः नेमाड्यांच्या समीक्षेबद्दल चाललेले आहे --

आदळ-आपट ? असलेल्या त्रुटींबाबत बोलूच नये ?

तसे असेल तर ब्राम्हणी, मराठा, दलित, स्त्रिया -- यांचीही वेगवेगळी असायला हवीत ! म्हणजेच माणसागणिक वेगवेगळी साहित्यिक मूल्ये ! -- थोडक्यात, माझी मते अंतिम -- एवढेच हो !

मराठी, भारतीय, इंग्लिश, जागतिक -- अशी वेगवेगळी असतात का साहित्यिक मूल्ये -- हेही जरा समजावून सांगा ना !

उदाहरणार्थ मला समजा वास्तववाद आवडतो -- तो नसला की साहित्यिक मूल्याचा अभाव ?

सत्ताधारी लोक तुमचे विचार, कल्पना, भाषा यांवर प्रभाव पाडतात -- अरे हो, ते फक्त परकीय सत्ताधारीच करतात असे नाही, स्वकीयही तेच करतात ! पूर्ण भाषेचा, नीतीकल्पनांचा साचा हा असाच घडतो, हे डिकन्स्ट्रक्शनवाल्यांनी शास्त्रीय विश्लेषणाने दाखवून दिलेले आहे ! यावर काय म्हणणे ?

उदाहरणार्थ -- पेंडसे, खानोलकर, रेगे, एलियट, बेकेट -- हे किरकोळ / बिनमहत्त्वाचे साहित्यिक आहेत -- तर ते कोणते साहित्यिक मूल्य नसल्यामुळे ?

त्याच्या पुढे त्यांनी म्हटलेले एखाद्या धडाकेबाज लेखकाला अधिक अपमानास्पद आहे -- " तुम्ही ज्यावर हल्ला करताय ते तुम्ही वाचले तरी आहे का, हीच शंका आहे ! "

स्वतःला मोठे न्यायाधीश समजायचे, कुणाला कोणत्या शिक्षा कोणत्या कलमाखाली दिल्या वगैरे सांगायची जबाबदारी घ्यायची नाही आणि भराभर वाक्या दोन वाक्यांत ओळीने अनेक लेखकांना शिक्षा फर्मावून ' संपले काम ' अशा उन्मादात पुन्हा शड्डू ठोकत उभे राहायचे -- असली फालतू समीक्षा त्यांनी प्रचारात आणली

स्टेजवर डालडाचा डबा आला -- हीही एक काँट्रिब्यूशन ठरावी ?

त्यावरही गहजब झाला होता ! जगण्यातले कोणते मटेरियल वापरले तर चालेल, हे कसे ठरवणार ?

उदात्तीकरण याचे वा तथाकथित नैतिकतेचेही नसावे !

आजच एका लेखात स्टाइबेकच्या ' द ग्रेप्स ऑफ राथ ' या कादंबरीतल्या एका दृश्याबद्दलचा मजकूर आहे. भुकेल्या बापाला मुलगी स्तनपान देते, असे ते दृश्य आहे -- मग सगळ्यांनीच असे करावे का, असा प्रश्न येत नाही. असंख्य परिस्थितींतून माणसांचे जगणे चालू असते. त्या दृश्यावर सुरुवातीला खूप गहजब झाला पण आता ती कादंबरी निवडकांपैकी एक समजली जाते. आणि कलाक्षेत्र हे कशाची समर्थने करणे या उद्देशासाठी नसतेच, असे मला वाटते. मानवी जगण्याचेच

मटेरियल घेऊन, जगणे समजून घेण्याची ती प्रक्रिया असते. काही लोक वाफ घालवण्यासाठी, सनसनाटीपणासाठीही ते स्वातंत्र्य वापरण्याची शक्यता असणारच.

-- माझे एवढेच म्हणणे आहे की कलेत ( दर्जाहीन वा दर्जेदार ) काय असायला हवे याची बंधने घालणाऱ्यांचे तत्त्वज्ञान सगळ्यांना बंधनकारक कोणत्या आधारावर करावे ?

' मनापलिकडे ' या नावाचे रजनीशांचे एक पुस्तक आहे -- हे जे आहे ते ' मनाचे ' जगणे आहे -- कलेचे माध्यम म्हणून मनाचे जगणेच असणार -- त्यात काहीच त्याज्य म्हणता येणार नाही -- यातूनही एखादी त्या मर्यादांचे ओलांडणे सूचित करणारी कलाकृती येऊ शकते --

तो कार्यक्रम बकवासच होता -- पण तसाही आवडणारे लोक होतेच तिथे -- कुणीही त्यांना मूर्ख अथवा नालायक ठरवण्यात कितपत तथ्य आहे -- हाही प्रश्न आहेच --

यातला वाफ जाण्याचाही एक प्रकार लक्ष्यात घ्यायला हवा -- रजनीशही लोकांना ------ ' हसा-रडा-ओरडा ' असे सांगत असत ---

त्या एकांकिकेच्या लेखनासाठी मला आय एन टी चे पारितोषिक मिळाले होते. ( संसाराणूपेंडघार ).

होय -- आणि तो इतका नाट्यभोक्ता की ती सादर करण्यापूर्वी त्याला माझ्याशी काही बोलायचे होते, त्यासाठी तो मुंबईहून , त्या वेळी मी नोकरीनिमित्त जिथे होतो त्या नगर जिल्ह्यातल्या वाळकी या गावी आला होता ! ( प्रकाश बुद्धिसागर ).

-- हे, प्रकाश बुद्धिसागर या माझ्या विनोद-सम्राट मित्राने व्यावसायिक रंगभूमीवर दिग्दर्शित केलेले त्याचे पहिले नाटक. हे प्रथम राज्यनाट्यस्पर्धेत सादर केले गेले होते. त्यात, माझ्या आठवणीप्रमाणे जयराम कधीच नव्हता. उदय म्हैसकरच होता. तुम्ही सांगितलेल्यांव्यतिरिक्त म्हणजे दीपा श्रीरामही होत्या ' पोत्यातून गोत्यात ' मध्ये.

राजेंद्र बाणाईत -- मी कोल्हापूरला असताना, आमचा पूर्ण ग्रुप आणि नेमाडेजी -- असा देशीचा जंगी कार्यक्रम झाला होता !

कर हा करी -- या गाण्याच्या पुढे गेले साहित्य !
खांडे / शिरवाड / करंदी कर ! आता शेवटी डे आलाय ! ( मटक्याच्या आकड्यांतही पाहिले तर शिस्त पाळलेली दिसते -- एका मित्रामुळे मलाही ते थोडे समजले होते ! )

मधू हा माझा एक असा मित्र आहे की साहित्य प्रांतात जिसके जासूस चारो तरफ फैले हुऐ हैं ! त्याच्याशी एक तास-दीडतास बोलून आल्यावर आपले बरेचसे अज्ञान दूर झाल्याचे समाधान मिळते !

' कालौघात कोमेजून जाणे ' असे आहे पोस्टमध्ये -- दादेला मुकल्यामुळे कोमेजून जाणे -- असे नाहीय --

.

आपण लिंगभानविरहित बोलणे-जगणे असे काही बोलत असलो तर -- खरेच, असते असे जगणे ?

इतके धारेवर असे मानवी वागणे जोखता येते का, या बाबतीत मी अनभिज्ञ आहे !

दाद मिश्र असते -- ते मानवी मन आहे -- पूर्ण शुद्ध काही असू शकत नाही -- पूर्ण शुद्ध, पवित्र !

-- चाललेल्या संवादाला तुम्ही एक खूपच नैतिक कोन देत आहात -- जगात तुम्हाला हवे तसे लोणचे कुठे उपलब्ध आहे ते सांगा -- काळाच्या ओघात स्त्रीचे सौंदर्य कोमेजत नाही ? कितीही सुंदर असली तरी ?

स्त्रीला ' छान ' म्हणणे धोक्याचे -- गॉगल छान आहे, म्हणावे झाले !

' बुडते जन हे न देखवे डोळा ' असे तुकाराम म्हणतो ते सगळ्यांसाठी असते --

विदीर्णतेत संस्कृती असू शकत नाही -- तिथे हिंसेचेच साम्राज्य असणार -- संस्कृतीची शक्यता, असलीच तर, फक्त एकात्मतेतच असू शकेल, हे तर्काने जरी समजले तरी संस्कृतीबद्दल चालणारे सगळे बोलणे फिजूल असल्याचे दिसून येईल.

मनाच्या कृतीच्या ठरलेल्या साच्याबाहेरचे असे काहीच मन समजून घेऊ इच्छित नसल्याने ' संस्कृती ' च्या आपल्या सगळ्या कल्पना फोल ठरत आलेल्या आहेत !

याचाच अर्थ, संस्कृतीत वस्तुतः आलेल्या महत्त्वाच्या गोष्टी मानवी मन नाकारत आलेले आहे ! त्यामुळे, संस्कृतीचे आपले आकलन खुजे, बोगस ठरते !

जे अर्जित करायचे ते आणि अर्जित करणारा, असे द्वंद्व वरील गोष्टींत असू शकत नसल्याने, मनाने ते सगळे माहिती-रूपात अर्जित करणे, हे आकलन होऊ शकत नाही -- त्यामुळे, काही माणसांना त्याचा शोध लागूनही ते निरर्थक ठरते !

प्रत्येक गोष्ट अर्जित करत जाणे हे माणसाच्या मनाचे वैशिष्ट्यच आहे -- चूक कुठे होते ? ते, अर्जन-प्रक्रिया नसलेल्या गोष्टीही त्याच विभागात जमा करत जाते ! तुकारामाची एकात्मता वा रिकामीक, सार्त्रचा नथिंगनेस, जेकेंची इंटेग्रिटी, कोणत्याही धर्मातली दुःखमुक्ती -- हे सगळे, मन नेहमीच्या सवयीत बसवून अर्जित करत जाते !

काही हजार वर्षांचा हा प्रवास झालेला आहे -- खूप प्रगती, ज्ञान, तत्त्वज्ञान सगळे बरेच झालेले आहे, अजूनही होत राहील. तरीही गळे चिरणे, जाळून मारणे, द्वेष, युद्धे हे चालूच आहे. माणसामाणसांतले एकूणच संबंध हे घर्षणमय, संघर्षमयच राहात आलेले दिसताहेत. हिंसा, क्रौर्य आणि वर्चस्वाची इच्छा अधिकाधिक तीव्र होताना दिसताहेत. हे असे होणारच असे गृहीत धरले जाते. प्रेम, बंधुता, शांतता यांच्या गप्पाही चालू राहतात. हे ढोंग, दुटप्पीपणा, निर्दयीपणा -- हे सगळे पाहता, माणसाच्या या एकूण प्रवासात काहीतरी कमी पडले आहे, असे नाही वाटत ? मनाच्या विदीर्णतेमुळे एक व्यक्ती म्हणूनही कुणी स्वस्थतेत जगू शकत नाहीय, असे दिसते. यावर एखाद्या मशीनचा वा औषधाचा शोध उपयोगी पडेल, की जाईल तसे जाईल, धडकेल तिथे धडकेल -- असेच म्हणावे ?

या दोन्ही शब्दांच्या अर्थांमध्ये मला एक गोष्ट सामान्य ( common ) दिसते -- ती म्हणजे -- अर्जित असणे, अर्जित होत राहणे आणि या प्रक्रियेमुळे होणारे आनुषंगिक बदल.

' संस्कृती ' या शब्दाचे अर्थ प्रामुख्याने मानसिक अंगाने आलेले दिसतात. परंपरेने आलेले ज्ञान, मूल्ये, श्रद्धा, कला आणि वागणे यांतला दर्जा, शिक्षण-प्रशिक्षणाने होणारी सुधारणा, वगैरे.

' सभ्यता ' या शब्दाच्या अर्थामध्ये -- मानवी समाजाची संस्कृती, विज्ञान, उद्योग, शासनव्यवस्था, सोयी, सुखाची साधने -- हे सर्व येते. ( रानटी पासून सभ्य पर्यंत पोचणे. ) विशेष म्हणजे या शब्दाच्या अर्थामध्ये ' संस्कृती ' ही अंतर्भूत आहे.

या शब्दांचे सामान्यतः मान्यताप्राप्त अर्थ समजून घेणे आवश्यकच आहे -- त्यानंतरच त्यांत काही कमतरता राहतेय का, ते कळेल --

अहो, आता इतकी उदाहरणे दिलीयत की वर -- भूमिकाहीन अमर्याद म्हणजे मी काही ' मुक्ती ' बद्दल बोलतोय, असे नाही -- राजकीय-सामाजिक परिवर्तन असे उद्दिष्ट नसलेले -- असा घेऊन बघा अर्थ --

-- अंतर्विरोध हा मानवनिर्मितच असतो -- तो गृहीत धरून आपापल्या पद्धतीने सगळ्या गोष्टींची मीमांसा करणे याला आपण विचार / बांधिलकी म्हणतो ! माणसातला अलगतावाद, आंतर्विरोध हा अटळ असतो, हे कोणत्या ईश्वरावर ढकलून गृहीत धरले जाते ? या विध्वंसक स्थितिशीलतेशिवाय भूमिकावाल्यांचे पानही हलू शकत नाही .

बुद्धिमत्ता जोखायला पुन्हा बुद्धीच लागणार -- ती कुणाकडे आहे ते आधी जोखावे लागणार !

यांची ' रस-अनौरस ', Rangnath Pathare यांची ' टोकदार सावलीचे वर्तमान ', मधू साबणे ची ' लीळा ', ' रणांगण ', जीएंची कथा, विचार केला तर बांधिलकीच्या क्षेत्राबाहेर खूप आहे.

' भूमिका ' ही एक खोटी कल्पित शिस्त असते --

उलट, माझे म्हणाल तर, सगळे जगणे बुद्धीच्या कक्षेत असते अशा समजुतीत जगणे हे नुसते रोमँटिकच नाही तर भ्रमिष्टपणाचे आहे.

तुकाराम, आरती प्रभू यांच्या कविता, काफ्काची ' ट्रायल ', आयनेस्को ची नाटके. उदाहरणे खूप आहेत. बांधिलकीवाल्यांचा आग्रही विभाग वगळून पाहता आल्यास भरपूर कलाकृती आहेत.

January 2015

JANUARY 31

मी तर खुश होईन -- आपल्या खऱ्या रूपात चंद्रमोहन यांच्या कुंचल्यातून ! बेष्ट म्हणेन मी !

त्या हॉलमध्ये एक चित्रप्रदर्शन चालू होते -- ते आयतेच जमून आले !

हे शब्द मी वापरत नाही -- इतरत्र वापरलेले दिसल्याने शंका -- इतकेच --

Shivaji Barve ने माझी दोन नाटके प्रकाशात आणली -- प्रकाशयोजना त्याची होती !

एका अटीवर चालेल -- नंतर लोकांनी ते थांबवायचा आग्रह केला तरी ते थांबवायचे नाही !

सोलवाँ साल --

खूळ आणि ढोंग ! तो मन दडपत, चेचत राहतो नुसता !

चंप्र म्हणजे काय हे समजा पंप्रंना कळले तर आपली लाईन चुकली, असे त्यांना वाटू शकते ! मीही खूप गरिबीतूनच चंप्र झालेलो आहे !

आपले आहे ते जगणे व्यक्त करणारे, स्वतःच्या सुखदुःखांना फकत अभिव्यक्ती देणारे -- हे लिहिणारे लेखक असले तरी सर्जक लेखक नसतात.

माझ्या सुरुवातीच्या काळात तर, आपणच पुनर्लेखन केले तर ते वेगळेच, पण, झेरॉक्सची सोय नसल्याने आणि टाइपिंग करून घ्यावे तर त्यात बऱ्याच चुका होत असल्याने, कविता, एकांकिका, नाटके पुन्हा पुन्हा लिहून काढावी लागत !

-- तसे नसते तर जगणे कदाचित अळणी झाले असते असे आपल्यातला हिंसक माणूस म्हणतो ! अहिंसक जगण्याबाबतचे निष्कर्ष हिंसक जगण्यातून काढले तर ते हमखास चुकीचेच असणार, हे स्पष्ट आहे !

सांगलीत एकदोनदा त्यांच्याशी गप्पा मारण्याची संधी मिळाली होती. त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

प्रश्न पडल्यामुळे -- ते समजून घेण्याच्या प्रक्रियेमुळे धर्म तयार झाले असावेत !

-- होय -- उसंडू आणि मुरावि ! आणि ललित साहित्यात सापडलेली खास वाक्ये देणारे बहुतेक ' फुलबाज्या ' या नावाचे सदर होते ! मजा यायची ! – ‘ उपसंपादकाच्या डुलक्या ‘, आणि ‘ मुद्रा राक्षसाचा विनोद ‘ !

आणि असे आपल्याला सापडलेले त्यात काही स्वीकारले गेले तर एक रुपया आणि अंक घरपोच येई !

मित्रांनो, ही उपसंपादकाची डुलकी या सदरात दिलेय ! दुरुस्त्या न करता मजकूर छापण्याचे प्रकार !

एका बँकेचे एक असे अधिकारी होते की नवीन शाखा उघडताना दक्षिणमुखी असलेल्या जागा ते नापास करत !

रवी, ही तर एक कॉमन सत्य गोष्ट आहे -- तसे तर द्वेष हीही एक कॉमन सत्य गोष्टच आहे ! त्याला काहीही म्हणा ! दुःख, डोके भरकटणे हे कॉमन नाहीय ? तर काय ?

मी शाळेत असताना बनावट कविता करून सत्यकथेकडे पाठवल्या होत्या -- लाथ घालून त्या नाकारल्या गेल्या होत्या ! कविता लिहिणाऱ्यांची याला तयारी असायलाच हवी !

गंमत आणि गांभीर्य -- दोन्ही एकत्र !

कविता जरा जास्त होताहेत हे मान्य पण एक लक्षणीय गोष्ट घडतेय -- इथल्या विशेषतः स्त्रियांच्या कविता बघा -- त्यांच्या पारंपरिक डोह, कृष्ण, राधा, बासरी यांतून बाहेर पडून आता त्या स्वतःच्या चिंतनातून कविता लिहिताहेत -- नुसते स्वतःचे सुखदुःखांचे अनुभव व्यक्त करताहेत, असेही नाही -- त्यांबद्दलचे त्यांचे आकलनही येते आहे -- काहीजणी तर कळत-नकळत तात्त्विक कविता लिहिताहेत -- प्लीज या गोष्टींचे स्वागत करा --

You commented on Uday Shankar Lagoo's photo.
'राहिल्या फक्त आता आठवणी:-
'घाशीराम कोतवाल'नाटकात पहिल्या प्रयोगा पासून ब्राम्हणांच्या पडद्यात माझ्या डावीकडे शेजारी असणारा सुनील कुलकर्णी,आज कायमचा काळाच्या पडद्याआड गेला.गेल्या ४२ वर्षातला सहवास संपला......,त्याच्या कुटुंबाच्या दुखां:त सहभागी,व मन:पूर्वक श्रद्धांजली..........'
स्मृतीस अभिवादन !

भयानक आहे ते जिणे ! अतुल पेठेची ' कचराकोंडी ' ही फिल्म आठवली ! त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक त्या वस्तूही त्यांना मिळत नाहीत !

इव्हन आपली पुराणातली वांगीही खाण्यायोग्य नाहीयत, म्हणतात !

कवितेपेक्षा कवितेच्या धमकीला माणूस जास्त घाबरतो, हे तुम्ही नीट ओळखलेय !

आदर्शाशी समरूप झालेले तोल ढासळलेले असतात आणि आदर्श आहे पण त्याच्याशी पूर्ण समरूपता नाहीय -- असे सगळे आंतर्विरोधाने युक्त असतात ! थोडक्यात, आदर्श असणे हे समस्या निर्माण करणारेच असते !

स्वतःच्या मनाचा एक सेन्सॉर तयार झालेला असतो !

You commented on Ina de Graaf's post.
Beauty is integrated mind.

तुम्ही कोणतीच काळजी करू नका -- माझ्यासह कोणताही माणूस -- या मूर्खांची व्याख्याच ग्राह्य धरली तरीही -- एकही माणूस स्वच्छ चारित्र्याचा असूच शकत नाही -- आणि मुळात खरे तर स्वच्छ चारित्र्य ही एक अफवा आहे --

मूर्ख आहेत ते -- दुर्लक्ष करा --

दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीचा व्यक्तिगत पातळीवरचा न्यायनिवाडा करणारे आपण सक्षम अधिकारी आहोत असे कुणीही समजणे हे निव्वळ गधडेपणाचे वाटते मला ! आणि कथेची समीक्षा करताना याची गरज काय ?

त्या आधी काजू, बदाम, दूध, अंडी यांचे शॉर्टेज होईल --

एका बँकेत एक स्त्री चेयरमन / एमडी होती. ती जनरल मॅनेजर्सनासुद्धा " यू स्टुपिड / यू फूल ' म्हणत असे -- चारचौघांत ! फायदे आणि नोकरी चालू राहावी म्हणून बरेच सहन करत -- पण एका जीएमने हे सहन न झाल्याने राजिनामा देऊन टाकला !

जेके म्हणतात, भीतीतून सुटणे हे साध्य कामाचे नाही -- भीतीकडेच पाहून तीच समजून घेणे, हेच अर्थपूर्ण -- जे तुम्ही करत आहात --

मीही मालाडचा डीएव्ही वाला ! ६१-६३.

' जुल्मी संग आँख लडी ' त्यातलेच ना ? अप्रतिम गाणे !

काफ्काच्या ' ट्रायल ' चे मी मराठी नाट्यरूपांतर केले आहे --

हे अपरिहार्य असते तर आपण बोललो कशाला असतो यावर ?

मला तसे वाटत नाही. कोणत्या तरी घट्ट मानसिक रचनेशी एकरूप होऊन जगण्याचे हे परिणाम आहेत.

आपल्यापेक्षा वेगळ्या मतांनी इतर कुणी जगत असण्यात यांना असुरक्षितपणा वाटत असातो ! जगण्याच्या प्रवाहातली ही अत्यंत भित्री आणि गधडी माणसे असतात !

प्रत्येक धर्मग्रंथाचे नाव घेऊन जेकेंनी, तुमचे सगळे धर्मग्रंथ फेकून द्या, असे म्हटले, ते त्यांच्या पुस्तकांत शाबूतही आहे ! तेव्हा बहुतेक या वेड्यांचे इतके बळ नसावे !

कलावंत ही आव्हाने कशी घेतात हेच यापुढे महत्त्वाचे ठरत राहील. या नीच प्रवृत्ती संपण्याची शक्यता दिसत नाही.

-- तेवढी एकच घटना नाही --खूप आहेत --

या स्टेटसमध्येच ते जमलेले आहे ! ( आणि मनच कधी कंप्लीट असू शकत नाही तर बोलणे कसे असणार हो ? )

बरे, कारले तर कारले ! माझेही अत्यंत आवडते !

अरे वा ! कारले आणि शेपू -- दोन्ही बेस्ट ! याचा एक ग्रुपच करू या !

नाही सांगितलेली -- पार्किन्सन टाईप त्रासासाठी ज्या गोळ्या होत्या त्यांतली एक कमी केलीय -- पाहू --

आज डॉक्टरीणबाई घरी येऊन गेल्या -- अमुक एक गोळी त्यांनी कमी करायला सांगितली आहे -- पाहू --
( आईसाठी ).

माझ्या एका नाटकात एक स्त्री दुसरीला विचारते -- " पंखे कोण पुसतं तुमच्याकडे ? "

हे मनांचे माध्यम आहे -- यात, याच्या आसपास मनांत येऊ शकणारे विचार -- किंचित चावटपणा असला तरी, मधेच व्यक्त होत राहणे आहे हे !

अलिकडेच माझ्या एका मित्राला कॅन्सरची शंका घेऊन आणि दोन्ही किडन्या फेल असे सांगून लुटले -- तिथे तो बरा होण्याची आशाच नव्हती -- तिथून भांडून डिस्चार्ज घेऊन तो दुसऱ्या इस्पितळात गेला तर तीन दिवसांत बरा होऊन घरी आला !

हिंदी पिक्चर्समध्ये वाईच वाईच बिहार म्हणून खपवले जाते म्हणे -- तेही बघा --

सिंपल मेनू ठेवायचा -- " ज्ञानाची भूक ही अन्नाच्या भुकेहून श्रेष्ठ " -- असे बोर्डच लावायचे सगळीकडे --

इतक्या प्रकारची डोकी असतात याचे भान येण्यानेही माणसाला शहाणपण येऊ शकते !

-- एक तर तुमचा hesitant approach -- महत्त्वाचा वाटतोय -- आणि तुम्ही सुचवलेल्या शक्यताही --

सत्कर्म आणि दुष्कर्म या व्यक्ति-समूह-देश-काल सापेक्ष संज्ञा आहेत -- शेवटी त्या त्या समूहाच्या रेट्यालाच नाइलाजाने महत्त्व देत जगावे लागते !

मुळात सगळे लोक जे धर्म धर्म म्हणतात ते बुरसटलेले वैचारिक साचे असतात नुसते -- हेच सारखे हॅमर करत राहिले पाहिजे !

' चारित्र्य ' ही एक वैचारिक संकल्पना असल्याने ती गोंधळाचीच असणार ! बहुमत, परमत वा स्वमत -- तिन्ही गोंधळाचेच असणार !

दुर्दैवाने हे स्टेटस बऱ्याचजणांना समजलेले दिसत नाही -- छोटी मुले जेव्हा प्रथमच घर सोडून एक दिवस राहण्याच्या सहलीला जातात तेव्हा माझ्या दृष्टीने ही नक्कीच उपयुक्त पद्धत आहे -- ज्यांना ती उपयुक्त वाटेल ते ती वापरतील -- बाकीच्यांना आग्रह नाहीय -- यात मुलांचा मोकळेपणा वगैरे सर्व अबाधित राहते हेही काहींना समजलेले दिसत नाहीय --

-- तुम्ही जाणताच की माझी काही स्टेटस ही निव्वळ निरीक्षणांवर आधारित असतात -- सत्य म्हणून नसतात -- त्यावर वेगवेगळी मते व्यक्त व्हावी हाच फक्त हेतू असतो --

अरे मित्रा, आपण एकदा सदारू भेटू या -- तुझ्याशी खूप बोलायचे आहे --

अहो, मी स्वतः तर व्हाटस अप वापरत नाही -- छोट्या मुलांच्या तरुण आईवडिलांचे सांगतोय --

समरूप होणे ( identify ) आणि फूट पाडणे ही विचाराची अतिमहत्त्वाची लक्षणेच आहेत !

कोणतीही कट्टरता ही वैचारिकच असते -- त्यात धार्मिक म्हणून वेगळे काही नसते -- असा हा मुद्दा आहे --

वा ! अभिनंदन ! बँकेत नोकरी केलेली असल्याने मी हा आनंद समजू शकतो !

उरले -- निराशावादगंड आणि आशावादगंड !

हिंदी पिक्चरची उदाहरणे द्या -- मग पटेल --

कसे कसे केसायाचे आहे मला --

दुसऱ्यासारखे होण्यात शक्ती वाया जाते -- स्वतःचे जगण्यात शक्ती पूर्ण उपयोगात येते -- आदर्श आणि जे आहे ते यांतला संघर्ष फिजूल असतो --

--आदर्श कुणीच नकोत -- आपल्या कुवतीने प्रत्येकाने फुलावे, जगावे --

इतर वाचनाबरोबर तेही वाचू द्यात पण ' त्यांच्यासारखे होणे ' घातक --

त्या माणसाची परिस्थिती, प्रश्न, प्रतिक्रिया देण्याची पद्धत -- सगळे वेगळे असते -- कुणीही कुणाचे आदर्श नाही होऊ शकत --

दुसऱ्यासारखे होणे नव्हे, स्वतःच्या कुवतीने स्वतःचे जगणेच महत्त्वाचे -- हे त्याचे कारण.

अरे वा ! जीना इसीका नाम है !

फ्रेंडस, सेकंड थॉटला माझे सारांश कोलमडताहेत ! आता माझ्या लक्षात येतेय की त्याला गव्हर्नमेंट सर्व्हंटबद्दल आदर आणि भीती असणार, त्यामुळे मी बचावलो -- त्या ऐवजी संताप असता तर ? आजच निकाल लागला असता माझा ! -- त्यामुळे, वरचे सारांश मागे घेऊन नवा देतोय सारांश -- अगदी वेड्याबद्दलही आपण सारांश काढू नये हे एक आणि दुसरे म्हणजे, आपल्याला शहाणपण आहे, हे नुसते अपघाताने ठरत असते !

नाटकाच्या प्रक्रियेला एखाद्या तंत्रज्ञासह सर्वांची चिंतनशीलता आणि सर्जकता आपापले योगदान देत असते. म्हणूनच, ते सगळे जर नीट जुळून आले तर हे माध्यम फारच स्फोटक अभिव्यक्ती देणारे ठरते. या प्रक्रियेतला कोणताही घटक जर स्वतःला ' लमाण ' म्हणवून घेत असेल तर मला ते चुकीचे, वाईट आणि शोकमय वाटते !

इथे अमोल पालेकरांनी आमच्याशी बोलताना सांगितलेल्या दोन आठवणी प्रस्तुत आहेत. (१) ते एकदा बादल सरकारांचे नाटक बसवणार होते त्या वेळी त्यांनी सरकारांना नाटकाचे एडिटिंग, सादरीकरण करताना घ्यावे लागणारे काही स्वातंत्र्य यावर सांगून त्यांची संमती विचारली होती. तेव्हा सरकार म्हणाले की तुला हवे तसे तू कर, फक्त मला जर पटले नाही तर त्याला फालतू म्हणायचे माझे स्वातंत्र्य अबाधित राहील. (२ ) एका लेखकाचे नाटक पालेकरांनी त्यांच्या स्वतःच्या विचाराने बसवले, त्याचे प्रयोगही सुरू झाले पण नंतर लेखकाशी टोकाचे मतभेद झाल्याने त्याचे प्रयोग बंद केले गेले !

' इराक ' याच नाटकाची एक वेगळी आठवण म्हणजे, जागतिक प्रश्नावर एका मराठी लेखकाने लिहिलेले नाटक, या एका वेगळ्या उत्सुकतेपोटी विजय तेंडुलकर आवर्जून, तब्येत बरी नसतानाही, पार्ल्याहून ते नाटक पाहायला माहीमला आले होते !

सामान्यतः नाटक हे लेखकाचे माध्यम आणि सिनेमा हे दिग्दर्शकाचे माध्यम, असे मानले जाते. हे सगळे बोलणे, कला कशासाठी – या प्रश्नाच्या दोघांच्या आकलनाशी संबंधित आहे. ( एकमेकांना आपापली कौशल्ये पुरेशी समजतात, हे गृहीत धरून ). ‘ प्रत्यय ‘ आणि थियेटर ऍकॅडेमी यांनी पन्हाळ्याला एक नाट्यचर्चा शिबिर ठेवले होते, तिथे मी गेलो होतो. त्यात शमीम ( की शमीक ) बॅनर्जी नामक एक विचारवंत बोलले होते. त्यांनी नेमक्या कोणत्या नाटकाचे उदाहरण दिले होते ते आठवत नाही, पण नाटकाचे नुसते नेपथ्यसुद्धा नाटकाचा अर्थ

कसा बदलू शकते ते सांगितले होते ! लेखकाचे आणि दिग्दर्शकाचे आकलन खूपच वेगवेगळे असेल तर शेवटी दिग्दर्शकच ते नाटक ताब्यात घेऊ शकेल. वैचारिक मतभेद, व्यक्तिगत मूल्ये यांत तफावत असलेले लेखक-दिग्दर्शक असतील तर हे प्रश्न येणार. माझ्या उदाहरणातून बोलायचे तर मी आणि लाखे किंवा मी आणि गिरीश पतके असे जेव्हा आम्ही एकत्र असतो तेव्हा आमचे काम एका ट्यूनिंगने चालते ! माझ्या लेखनाला ते जे दृश्यरूप देतात त्याने माझा आनंद द्विगुणित होतो. सर्वच दिग्दर्शकांबरोबर अशी एक प्रक्रिया चालणे शक्य नसते. तशा वेळी दिग्दर्शक फारसा मताग्रही नसेल तर लेखक आणि तो मताग्रही असेल तर दिग्दर्शक प्रभावी ठरू शकतो.

दुबेजींनी माझे ‘ नाणेफेक ‘ हे नाटक दिग्दर्शित केले होते. ते वाचल्यावर त्यांनी दोन प्रश्न विचारले होते – चेतन दातारने ते मला कळवले होते. त्यांचे प्रश्न नक्कीच योग्य होते – मला ते रास्त वाटले होते. त्या अनुषंगाने मी काही अधिक लेखन / काही पुनर्लेखन करून त्यांना पाठवले होते. ते त्यांना फारच आवडले ! ते चकितही झाले ! त्यानंतर एका भाषणात आणि एका लेखातही ‘ नाणेफेक ‘ चे ते उदाहरण देऊन, त्यांनी माझ्या बुद्धीचा आणि समजुतीचा गौरवोल्लेख केला होता. पण, ते लेखकाला पूर्ण नाटकच बदलायला लावून ते स्वतःचे नाटक लिहून घेतात – अशा स्वरूपाचा त्यांच्यावर जो आरोप काहीजण करतात, तसा अनुभव मला त्या वेळी आला नाही.

माझे ‘ जणू काही वास्तव ‘ हे नाटकही त्यांना करायचे होते. त्यासाठी एम आय जी मध्ये मस्त पिऊन-खाऊन आमच्या दीर्घ चर्चा झाल्या होत्या. पण ते त्यांच्या अपेक्षेप्रमाणे करायचा नाद मी सोडून दिला.

एकदा दुबेजींशी माझे जोरदार भांडणही झाले होते. पिणे चालू असताना ! ते मला म्हणाले की तुझे ‘ इराक ‘ हे नाटक मी मुळीच पाहणार नाही – आपला आणि इराकचा संबंध काय ? -- त्यांच्या या बोलण्याचे मला खूप आश्चर्य वाटले ! मी अक्षरशः त्यांच्यावर ओरडूनच बोललो ! तसे तर माझ्या आणि तुमच्या जगण्याचा तरी संबंध काय ? – असे मी त्यांना विचारले होते.

पुणे विद्यापीठाने काही दिग्दर्शकांची भाषणे आणि चर्चा – असा कार्यक्रम एकदा आयोजित केला होता. त्यात दुबेजी सुमारे चार तास बोलले होते – ते कुठे रेकॉर्डेड उपलब्ध असेल तर एका दिग्दर्शकाचे उत्तम भाषण म्हणून जरूर ऐकावे !

एकच ठाम मत बनवावे, अशी ती व्यक्ती नव्हती.

तसे तर, दुबेजी काय किंवा विजयाबाईही काय – हे इनसाईट असलेले प्रतिभावान दिग्दर्शक होते का, की नाटक या माध्यमाचे कौशल्य आत्मसात झालेले किमयागार होते, हा प्रश्न पडतोच !